
बुधवार, १५ डिसेंबर २०२१

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक १४८
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## मोस्ट वाँटेड दहशतवादी अबू झारारचा खात्मा



**श्रीनगर** : गेल्या अनेक वर्षांपासून मोस्ट वाँटेड असलेला दहशतवादी अबू झारारचा अखेर जम्मू-काश्मीरच्या पूंछ-राजौरी जिल्ह्यामध्ये खात्मा करण्यात आला आहे. लष्कर आणि जम्मू-काश्मीर पोलिसांच्या संयुक्त कारवाईमध्ये अबू झारारला कंठस्नान घालण्यात यश आले. चार महिन्यांपूर्वी ऑगस्ट महिन्यात अबू झारार पहिल्यांदा पूंछ जिल्ह्यात दिसला होता. तेव्हापासून लष्कर आणि पोलीस त्याच्या मागावर होते. पूंछ-राजौरी भागामध्ये पुन्हा एकदा दहशतवादी कारवाया सुरू करण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपवण्यात आली होती, तसेच सुरक्षा दलांवर मोठे हल्ले करण्याचे टार्गेट त्याला त्याच्या पाकिस्तानातील म्होरक्यांनी दिले होते, अशी माहिती जम्मू-काश्मीर पोलिसांकडून देण्यात आली आहे.

**अंतरंग**

पनवेल मनपातर्फे स्वच्छता अभियानांतर्गत विविध स्पर्धा/२

घोडीवली-बीड खुर्द रस्त्यासाठी ग्रामस्थ आक्रमक/५

खेलो इंडिया स्पर्धेतर्गत 'सीकेटी'त कुस्तीचे सामने/६

### विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीला धक्का

# नागपूर, अकोल्यात भाजपची बाजी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य विधान परिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने महाविकास आघाडीला जोरदार धक्का देत दोन्ही जागांवर विजय मिळविला आहे. नागपूरमधून भाजप नेते आणि राज्याचे माजी ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे विजयी झाले आहेत, तर अकोल्यातून भाजपच्याच वसंत खंडेलवाल यांनी विजय मिळवला आहे.

विधान परिषदेच्या एकूण सहापैकी चार जागांची निवडणूक बिनविरोध झाली होती, मात्र नागपूर आणि अकोला या जागांसाठी एकमत होऊ न शकल्यामुळे या ठिकाणी निवडणूक झाली. यामध्ये मतदारांनी महाविकास आघाडीला नाकारल्याचे मंगळवारी (दि. १४) मतमोजणीअंती स्पष्ट झाले.

नागपुरात मतमोजणी प्रक्रियेमध्ये एकूण ५४९ मते वैध ठरल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांनी जाहीर केले. त्यानुसार विजय मिळवण्यासाठी २७५ मते मिळवणे आवश्यक होते. यात भाजपचे उमेदवार चंद्रशेखर बावनकुळे यांना ३६२ मते मिळाली. काँग्रेस उमेदवार मंगेश देशमुख यांना १८६ मते पडली, तर भाजपमधून काँग्रेसमध्ये गेलेले आणि महाविकास आघाडीकडून ऐनवेळी उमेदवारी माघार घेण्यास लावण्यात आलेले रवींद्र ऊर्फ छोटू भोयर यांना अवघे एक मत मिळाले. नागपुरात काँग्रेसची मते मोठ्या प्रमाणात फुटली आहेत.

एकीकडे नागपुरात चंद्रशेखर बावनकुळेंनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला असताना दुसरीकडे अकोल्यातही हेच चित्र दिसून आले. अकोल्यातील मतमोजणी पूर्ण झाली तेव्हा भाजपचे उमेदवार वसंत खंडेलवाल यांच्या पारड्यात तब्बल ४४३ मते पडली होती, तर शिवसेनेचे उमेदवार गोपीकिशन बाजोरिया यांना ३३४ मते मिळाली. या प्रक्रियेमध्ये ३१ मते बाद ठरली.

नागपूरमध्ये काँग्रेसने आधी छोटू भोयर यांना पक्षाकडून उमेदवारी दिली होती, मात्र ऐनवेळी उमेदवार बदलून भोयर यांच्याऐवजी अपक्ष उमेदवार मंगेश देशमुख यांना आपला पाठिंबा जाहीर केला. विशेष म्हणजे भोयर यांना या निर्णयाविषयी कोणतीही कल्पना नसल्याचे नंतर समोर आले. त्यामुळे आघाडीत आलबेल नाहीए.



निवडणुका बिनविरोध करू असा शब्द काँग्रेसने न पाळल्यामुळे झालेल्या निवडणुकांत भाजपला मोठे यश मिळाले आहे. आता महाविकास आघाडीला माझे खुले चॅलेंज आहे. विधानसभा अध्यक्षपदाची निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने घेऊन दाखवा. कायद्यात बदल करून रडीचा डाव खेळू नका.
**-चंद्रकांत पाटील**, भाजप प्रदेशाध्यक्ष

नागपूर आणि अकोल्याच्या मतदारांचे मी आभार व्यक्त करतो. ग्रामपंचायतींच्या निवडणुकांपासून ज्या निवडणुका झाल्या त्यात राज्यातील जनतेने प्राधान्य भाजपला दिले. घोडेबाजार करूनही मतदारांनी भाजपलाच पाठबळ असल्याचे दाखवून दिले.
**-प्रवीण दरेकर**, विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधान परिषद

### महाविकास आघाडीला चपराक!

भाजपच्या विजयावर प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माझे सहकारी चंद्रशेखर बावनकुळेंना मोठा विजय मिळाला आहे. खरंतर मी स्वतः निवडून आलो तेव्हा झालेल्या आनंदापेक्षाही जास्त आनंद आज बावनकुळेंच्या विजयाचा मला झाला आहे. अकोल्यात वसंत खंडेलवाल यांनीही निर्णायक विजय मिळवला आहे. विधान परिषदेच्या सहापैकी चार जागी भाजप निवडून आली आहे. भाजपच्या विजयाने महाविकास आघाडीला चपराक दिली आहे. महाविकास आघाडीत तीन पक्ष एकत्र आले म्हणजे सगळ्या प्रकारचे विजय होऊ शकतात, असे मांडले जात असलेले गणित चुकीचे आहे हेही या विजयाने स्पष्ट केले आहे. राज्यातील जनता भाजपच्या पाठीशी आहे आणि भविष्यातही आम्हाला आशीर्वाद मिळेल.

### आरक्षणासह विविध मागण्यांसाठी ओबीसी समाजाची

# चक्काजाम आंदोलनाची हाक

■ १७ डिसेंबरला रस्त्यावर उतरण्याचा निर्धार

**पुणे : प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षणाच्या अध्यादेशाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिल्यानंतर ओबीसी आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला आहे. आता ओबीसी समाजाने पुन्हा आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. आपल्या विविध मागण्यांसाठी ओबीसी समाज १७ डिसेंबरला चक्काजाम आंदोलन करणार आहे, अशी घोषणा ओबीसी जन मोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप यांनी केली.

राज्य सरकारने इम्पेरिकल डेटा सुप्रीम कोर्टाकडे तत्काळ द्यावा, अशी मागणी ओबीसी समाजाकडून करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ओबीसींचे आरक्षण पूर्ववत होत नाही तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये होणाऱ्या निवडणुका थांबवण्याची मागणीही करण्यात आली आहे. तसे न झाल्यास १७ डिसेंबरला चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा ओबीसी मोर्चाकडून देण्यात आला आहे. त्यामुळे आता राज्य सरकार याबाबत काय भूमिका घेणार हेही पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**सुप्रीम कोर्टात आज पुन्हा सुनावणी**

ओबीसी आरक्षणासंबंधी सुप्रीम कोर्टात मंगळवारी होणारी सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. आजची सुनावणी जवळपास अर्धा तास चालली. त्यात निवडणुका आणि इम्पेरिकल डेटा याबाबत युक्तिवाद झाल्याची माहिती समोर आली आहे, मात्र सुनावणी पूर्ण झाली नाही. त्यामुळे आता या प्रकरणावरील सुनावणी बुधवारी (दि. १५) सकाळी ११ वाजता होणार आहे.

### अनिल देशमुखांच्या कोठडीत वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

१०० कोटी रुपयांची वसुली आणि पैशांच्या अफरातफरीप्रकरणी राज्याचे माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल देशमुख यांच्या न्यायालयीन कोठडीत १४ दिवसांची वाढ करण्यात आली आहे.


अनिल देशमुख यांना सक्तवसुली संचालनालयाने अटक केलेली असून ते सध्या मुंबईतील ऑर्थर रोड कारागृहात आहेत. त्यांच्या न्यायालयीन कोठडीत २७ डिसेंबरपर्यंत वाढ करण्यात आली आहे.

## पहिली ते सातवीचे वर्ग आजपासून होणार सुरू

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई, नवी मुंबईसह अन्य काही ठिकाणी बुधवार (दि. १५) पासून इयत्ता पहिली ते सातवीच्या शाळा सुरू होत आहेत. कोविडविषयक नियमांचे पालन करून शाळा सुरू करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

मागील वर्षीच्या मार्चपासून शाळा कोरोना परिस्थितीमुळे बंद होत्या. त्यानंतर टप्प्याटप्प्याने वर्ग भरू लागले. शहरातील पहिली ते सातवीचे वर्ग १ नोव्हेंबरपासून सुरू केले जाणार होते, पण ओमायक्रॉनच्या भीतीमुळे ते सुरू करण्यात आले नव्हते. हे वर्ग १५ डिसेंबरपासून सुरू करणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार आता पालिका क्षेत्रातील पहिली ते सातवीचे वर्ग बुधवारपासून सुरू होत आहेत.



**निवडक**

### राहुल गांधींचा मुंबईतील मेळावा अखेर पुढे ढकलला

**मुंबई** : काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा मुंबईतील मेळावा ओमायक्रॉनचे संकट असल्याने पुढे ढकलण्यात येत असल्याचे काँग्रेसचे मुंबई अध्यक्ष भाई जगताप यांनी मंगळवारी (दि. १४) पत्रकार परिषदेत सांगितले, तसेच नवी तारीख जाहीर झाल्यावर शिवाजी पार्कमध्येच मेळावा होईल, असे सांगतानाच पक्षाच्या स्थापना दिनाचा कार्यक्रम तेजपाल ऑडिटोरियममध्ये घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### खोट्या आरटी-पीसीआर रिपोर्टप्रकरणी चौघांना अटक

**बंगळुरू** : भारतात आढळलेल्या पहिल्या ओमायक्रॉन रुग्णाला खोटा आरटी-पीसीआर रिपोर्ट दिल्याप्रकरणी कर्नाटक पोलिसांनी चौघांना अटक केली आहे. संबंधित दक्षिण आफ्रिकेतून आलेल्या व्यक्तीला खाजगी लॅबमधून कोरोना निगेटिव्ह रिपोर्ट देण्यात आला होता. त्यानंतर हा व्यक्ती पुन्हा आफ्रिकेत गेलाय.

## सचिन वाझे प्रकरणात मुळाशी गेले तर फटाके फुटतील -राज ठाकरे

**औरंगाबाद : प्रतिनिधी**

सचिन वाझे सहा महिने जेलमध्ये होते. नंतर ते शिवसेनेत आले. कार्याध्यक्षांच्या जवळचे झाले. मुकेश अंबानीसुद्धा कार्याध्यक्षांजवळचे. हा एक जवळचा माणूस दुसऱ्या जवळच्या माणसाच्या घराबाहेर बॉम्ब लावतो हेच मला कळत नाही. म्हणून मी यावर जास्त बोलत नाही, मात्र वाझे प्रकरणाच्या मुळाशी गेले, तर फटाक्यांची माळ फुटेल, असा दावा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केला आहे. ते मंगळवारी (दि. १४) औरंगाबाद दौऱ्यावर असताना बोलत होते. या वेळी त्यांनी अनेक विषयांवर आपले मत व्यक्त केले.



राज ठाकरे म्हणाले की, मूळ विषय बाजूला ठेवून नको तो विषय पुढे आणला जात आहे. पत्रकारांचाही वापर सुरू आहे. आर्यन खान २८ दिवस आत होता. बाहेर पडल्यावर काहीच नाही. सुशांत सिंग, अंबानी घराबाहेर बॉम्ब पुढे काय झाले. काहीही नाही. मूळ विषय बाजूला ठेवून दुसरेच सुरू आहे.

पेपरफुटी प्रकरणावर बोलताना राज यांनी म्हटले की, राज्यात पेपर फुटण्याची ही काही पहिली वेळ नाही. याआधीही अनेकदा पेपर फुटले आहेत. पेपर फोडणारे अजून सापडले नाही ते वाईट आहे. त्यांच्यांवर कठोर कारवाई होत नाही. सरकार म्हणून वचक राहिलेला नाही.

राज्य सरकार काहीतरी कारण काढून निवडणुका पुढे ढकलत आहे. आता फेब्रुवारीत तारखेनुसार निवडणुका होतील, असे वाटत नाही. ज्या निवडणुका आहेत त्या होतील की नाही याची खात्री नाहीए. त्यामुळेच ओबीसी आरक्षणाचे नवे प्रकरण सुरू केले आहे, असा आरोप राज ठाकरे यांनी या वेळी केला.

### सुधागडात अल्पवयीन मुलीवर बलात्कार; आरोपी अटकेत

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील गोकुळवाडा येथे एका अल्पवयीन मुलीवर रविवारी रात्रीच्या सुमारास बलात्कार झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी युवकाला अटक करण्यात आली असून त्याला १७ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

पीडित मुलगी माथेरान येथे राहते. ती सुधागडमधील गोकुळवाडा येथे नातेवाईकांकडे राहायला आली होती. नेरळ येथे राहणाऱ्या मारूफ शेख (वय १९) याने गोकुळवाडा येथे मुलीच्या घरी जाऊन तिच्यासोबत काढलेले फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन बलात्कार केला व घडलेला प्रकार कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## क्रिकेटपटू रोहित शर्मा झाला अलिबागकर

### सारळ येथे चार एकर जागेची खरेदी



**अलिबाग : प्रतिनिधी**

भारताचा मर्यादित षटक संघाचा कर्णधार रोहित शर्मा आता अलिबागकर झाला आहे. त्याने अलिबाग तालुक्यातील सारळ येथे चार एकर जागा खरेदी केली आहे. मांडवा बंदरापासून जवळच असलेल्या या जागेचा व्यवहार नऊ कोटी रुपयांना झाला असल्याची सूत्रांची माहिती आहे.

रोहित शर्मा मंगळवारी (दि. १४) जागेचे खरेदीखत रजिस्टर करण्यासाठी पत्नी रितिका हिच्यासह अलिबाग येथील दुय्यम निबंधक कार्यालयात आला होता. रोहित हा रायगड जिल्ह्यात इनोव्हा कारमधून आल्याने त्याच्या आगमनाची कुणकुण फारशी कुणाला लागली नाही. तरीही रोहित आल्याचे कळताच त्याच्यासोबत सेल्फी काढण्यासाठी चाहत्यांनी गर्दी केली होती.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार रोहित शर्मापाठोपाठ ऋषभ पंत आणि हार्दिक पांड्या हेदेखील लवकरच अलिबागकर होणार आहेत. अलिबाग तालुक्यात ते जागा आणि रो हाऊस खरेदी करणार असल्याचे समजते.

## लहान मुलांसाठी सहा महिन्यांत येणार लस

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सिरम इन्स्टिट्युटकडून लहान मुलांसाठीदेखील लस लवकरच लाँच केली जाणार आहे. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री या संस्थेने 'सिरम'चे मुख्य कार्यकारी अधिकारी अदर पूनावाला यांना चर्चासत्रात आमंत्रित केले होते. या वेळी त्यांनी तीन वर्ष आणि त्यावरील वयोगटासाठी येत्या सहा महिन्यांत कोवावॅक्स लस लाँच केली जाईल, असे सांगितले.


**'सिरम'चे सीईओ पूनावालांची माहिती**



पूनावाला म्हणाले की, लहान मुलांसाठी असलेली आमची कोवावॅक्स ही लस सध्या चाचणी स्तरावर आहे, पण तिच्या चाचण्यांचे अतिशय उत्तम निष्कर्ष दिसत आहेत. अगदी तीन वर्ष वयाच्या मुलांवरदेखील या लसीची चाचणी करण्यात आली आहे. चाचण्यांमधून येणाऱ्या निष्कर्षांचा विचार करता लहान मुलांसाठीची आमची लस येत्या सहा महिन्यांत लाँच केली जाईल.

दरम्यान, ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना बूस्टर डोस देण्यात यावा, अशी मागणी केली जात आहे. त्याबाबतसुद्धा पूनावाला यांनी मत व्यक्त केले आहे. बूस्टर डोसमुळे मोठ्या प्रमाणात अँटीबॉडीज मिळतील, असे काही डेटाच्या आधारे सिद्ध झाले आहे, असे पूनावाला यांनी या वेळी सांगितले.

पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी



पनवेल महानगरपालिका हद्दीत
बुधवार, दि. १५ डिसेंबर २०२१ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
३. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
६. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२

सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.

७. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
८. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
१०. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
११. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१३. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१४. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
१५. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोवॅक्सिन

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. काळण समाज हॉल, पनवेल    २. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

पनवेल ग्रामीण लसीकरण

- वळवली रा.जि.प. शाळा
- रोहिंजण रा.जि.प. शाळा
- मुर्बी रा.जि.प. शाळा
- कोयनावेळे रा.जि.प. शाळा
- पाले खुर्द रा.जि.प. शाळा
- पेंधर रा.जि.प. शाळा
- तळोजे मजकूर रा.जि.प. शाळा
- कळंबोली काळभैरव मंदिर सभागृह
- आसुडगाव रा.जि.प. शाळा
- जुई रा.जि.प. शाळा

# खारघर भाजपतर्फे दिव्य काशी, भव्य काशी कार्यक्रम उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

प्रदेश भाजप व उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष प्रशांत ठाकूर यांच्या सूचनेनुसार काशी विश्वनाथ कॉरिडॉरच्या व विकासकामांच्या उद्घाटन सोहळ्यानिमित्त खारघर भाजपतर्फे दिव्य काशी, भव्य काशी कार्यक्रम उत्स्फूर्तपणे साजरा करण्यात आला.

काशी विश्वनाथ मंदिर कॉरिडॉरची पुनर्बांधणी याची देही याची डोळा पाहण्यासाठी खारघर सेक्टर १२ मधील दुर्गामाता मंदिर येथे असंख्य भक्तगण, कीर्तनकार व आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर एकत्र जमले होते. या वेळी कीर्तनकार, वारकरी संप्रदाय व आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये ह.भ.प. हेमंत महाराज मोरे, पंडित अरुण शास्त्री, पंडित सुनील वाजपेयी, पंडित उमेश चतुर्वेदी, ह.भ.प. दशरथ महाराज जाधव, आत्माराम पाटील, पोपट बगाटे, आप्पासाहेब घायाळ, म्हातारदेव शिरसाट, उत्तरेश्वर उंबरे, जगन्नाथ महाराज भानत, संगीता खोकले, सुनीता साबळे आदी आध्यात्मिक क्षेत्रात कार्य करणारे कीर्तनकार व साधूसंतांचा मानाची शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.




या कार्यक्रमास भाजप खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक अभिमन्यू पाटील, शत्रुघ्न काकडे, अ‍ॅड. नरेश ठाकूर, रायगड जिल्हा चिटणीस गीता चौधरी, सरचिटणीस दीपक शिंदे, कीर्ती नवघरे, उपाध्यक्ष दिलीप जाधव, रमेश खडकर, बिना गोगरी, सोशल मिडिया सहसंयोजक मोना अडवाणी, जिल्हा महिला मोर्चा उपाध्यक्ष संध्या शारबिद्रे, आध्यात्मिक सेल संयोजक नवलकुमार मोरे, उत्तर भारतीय सेल संयोजक विनोद ठाकूर, ज्येष्ठ नागरिक सेलचे संयोजक नवनीत मारू, बंडू शिंगरूट, गुरुनाथ म्हात्रे, अशोक पवार, सुनील गायकवाड, आदेश भोईर, आनंद कांबळे, राजू विरेकर, भरत मोरे, भाऊ घुले, सिद्धेश खडकर, विनोद दाभोलकर, प्रिया मिश्रा, आशा घाडगे, पुष्पा शिंगरूट, मीनाक्षी कसबले, रत्ना शुक्ला, छाया पांडे, वर्षा कसबले आदी कार्यकर्ते, पदाधिकारी व भक्तगण उपस्थित होते.

## पनवेल मनपातर्फे स्वच्छताविषयक विविध स्पर्धा

**पनवेल : प्रतिनिधी**

स्वच्छ भारत अभियान स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत पनवेल महापालिका क्षेत्रात चित्रकला, पोस्टर जिंगल, गाणी, व्हिडिओ, शॉर्ट फिल्म, पथनाट्य, भित्तीचित्र स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी यात सहभागी होऊन स्वच्छताविषयक जनजागृतीमध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन पालिकेने केलेय.

या स्पर्धेसाठी स्वच्छ सुंदर आधुनिक पनवेल शहर संकल्पना, माझी वसुंधरा अभियान, घनकचरा व्यवस्थापन (कचरा वर्गीकरण व कचरा प्रक्रिया), प्लास्टिक प्रदूषणाचे परिणाम, हागणदारीमुक्त पनवेल शहर, कचरा पुनर्चक्रीकरण पुनर्वापर करणे, नावीन्यपूर्ण संकल्पना व प्लास्टिक बंदी (३ आर-रिड्युस, रियूझ, रिसायकल) असे विषय आहेत. नागरिकांनी ऑनलाईन प्रवेश नोंदवायचा असून २५ डिसेंबरपर्यंत आविष्कार पाठवायचे आहेत. स्पर्धेसाठी शुल्क नाही. ओळखपत्र आवश्यक आहे.

या स्पर्धेत ग्रुपनेही सहभागी होता येईल. सर्व स्पर्धकांनी आपले आविष्कार दोन कॉपीमध्ये डीव्हीडीत स्वच्छ भारत अभियान कक्ष, दुसरा मजला, अग्निशमन इमारत, पनवेल महापालिका येथे किंवा ऑनलाईन जमा करावे. स्पर्धेतील प्रत्येक गटात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे तीन, दोन, एक रुपयांचे पारितोषिक, प्रशस्तिपत्रक आणि सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. प्रवेश निश्चितीसाठी दिलेला क्यूआर कोड स्कॅन करावा तसेच अधिक माहितीसाठी swachhpanvel.competition@gmail.com या आयडीवर किंवा स्वच्छ भारत अभियान कक्षाशी संपर्क साधावा, असे पालिकेचे आवाहन आहे.

स्पर्धेत प्रवेश निश्चितीसाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा



**पनवेल : येथील कापड बाजारात सुजाता नवाळे यांच्या रॉयल किड्स अ‍ॅण्ड लेडीज वेअर या नवीन दुकानाचे उद्घाटन महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी झाले. या वेळी नगरसेवक राजू सोनी, वामन नवाळे, हिमानी नवाळे, विनीत डाकी, दर्शनी कोळी, दत्ताराम कोळी, जयवंत डाकी, रंजना डाकी, प्रणय कोळी, केतन शहा, शैलेश शहा, तुषार नवले, प्रवीण जाधव आदी उपस्थित होते.**


### जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. २ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./५८/२०२१**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. — **वादी**

**विरूद्ध**

**१) श्री. तानाजी दत्तात्रेय सुर्यवंशी**
रा. त्रिवेणी सदन बिल्डींग, तिसरा मजला, ब्लॉक नं. १०, कातरंग, विणानगर रोड, अ‍ॅन्थोनी चर्चसमोर, विणानगर, खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड ४१० २०३ — **प्रतिवादी**

दावा रुपये १,०६,१४१/-

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ०१/०१/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ३०/११/२०२१ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.
सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क I/C**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**



### जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. २ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./६६/२०२१**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. — **वादी**

**विरूद्ध**

**१) श्री. तानाजी दत्तात्रेय सुर्यवंशी**
रा. त्रिवेणी सदन बिल्डींग, ब्लॉक नं. १०, अ‍ॅन्थोनी चर्चच्या समोर, खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड ४१० २०३ — **प्रतिवादी**

दावा रुपये १,३९,४६२/-

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ०१/०१/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ३०/११/२०२१ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.
सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क I/C**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**



### जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. १ व ३ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./६४/२०२१**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. — **वादी**

**विरूद्ध**

**१) श्री. निरंतर फ्रान्सीस तोफो**
रा. कल्पतरू बिल्डींग, चैतन्यनगर, रुम नं. २१२/२, गगनगिरी मठाशेजारी, वरची खोपोली, पो. खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड ४१० २०३
**२) श्री. मयूर जगदीश विटे**
रा. लुनबीनी बुद्धविहार, प्रकाशनगर, खोपोली, पो. खोपोली, ता. खालापूर जि. रायगड ४१० २०१ — **प्रतिवादी**

दावा रुपये ७३,३६७/-

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ०१/०१/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ३०/११/२०२१ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.
सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क I/C**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**



### उरण नगरपरिषद
### निविदा सूचना

**जा.क्र.उनप/बांवि/२९८१/२०२१-२०२२**
**उरण नगरपरिषद,**
**उरण, दिनांक :- १४/१२/२०२१**

उरण नगरपरिषद खाली नमूद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी कंत्राटदारांकडून मोहरबंद निविदा मागवित आहे. निविदा खाली नमूद केलेल्या मुदतीत मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या नांवे दाखल करणेच्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रुपये) | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | | कामाची मुदत | निविदा फॉर्म फी रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २% रोखीने | ७% रोखीने | | |
| १ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर गार्डन येथे आरोग्य विभागाकडील साहित्य ठेवणेकरिता रूम तयार करणे. | रु. १,५६,०६५/- | रु. १,५६१/- | रु. ३,१२१/- | रु. १०,९२५/- | ३० दिवस | रु. ५००/- |
| २ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील सिव्हील कोर्टाजवळ गटाराचे बांधकाम करणे. | रु. २,००,०००/- | रु. २,०००/- | रु. ४,०००/- | रु. १४,०००/- | ३० दिवस | रु. ५००/- |
| ३ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील कुंभारवाडा - उरण येथील श्री. दिपक पाटील यांचे घरापासून ते श्री. बाळकृष्ण पाटील यांचे घरापर्यंत मुख्य रस्त्याचे गटारावर आर.सी.सी. स्लॅब टाकणे. | रु. १,४३,२२८/- | रु. १,४३२/- | रु. २,८६४/- | रु. १०,०२६/- | ३० दिवस | रु. ५००/- |
| ४ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील कुंभारवाडा - उरण येथील श्री. हेमंत पाटील यांचे घरापासून ते श्री. वेवडे यांचे घरापर्यंत मुख्य रस्त्याचे गटारावर आर.सी.सी. स्लॅब टाकणे. | रु. १,४३,२२८/- | रु. १,४३२/- | रु. २,८६४/- | रु. १०,०२६/- | ३० दिवस | रु. ५००/- |
| ५ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील कुंभारवाडा - उरण येथील श्री. श्रीधर घरत यांचे घरासमोरील मुख्य रस्त्याचे गटारावर आर.सी.सी. स्लॅब टाकणे. | रु. १,४३,२२८/- | रु. १,४३२/- | रु. २,८६४/- | रु. १०,०२६/- | ३० दिवस | रु. ५००/- |
| ६ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील कुंभारवाडा - उरण येथील श्री. गोविंद घरत यांचे घरासमोरील मुख्य रस्त्याचे गटारावर आर.सी.सी. स्लॅब टाकणे. | रु. १,४३,२२८/- | रु. १,४३२/- | रु. २,८६४/- | रु. १०,०२६/- | ३० दिवस | रु. ५००/- |
| ७ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील बोरी पाखाडी स.नं. १८०/अ/१/अ या जागेभोवती तारेचे कुंपण बांधणे. | रु. १,२०,९६०/- | रु. १,२५०/- | रु. २,४१९/- | रु. ८,४६७/- | ३० दिवस | रु. ५००/- |

**अटी/शर्ती :**

**(१) इसारा रक्कम :-** कामाची इसारा रक्कम धनाकर्ष/रोखीने नगरपरिषदेच्या लेखा विभागात दिनांक १५/१२/२०२१ ते २३/१२/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत भरणेची आहे. जे ठेकेदार इसारा रक्कम भरणा करणार नाहीत अशा ठेकेदारांच्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**(२) कोरे निविदा नमुने विक्री :-** कोऱ्या निविदांचे नमुने नगरपरिषदेच्या लेखा विभागात निविदा शुल्क (न परतीचे) रोखीने भरणा केल्यास दिनांक १५/१२/२०२१ ते २३/१२/२०२१ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत नगरपरिषदेच्या बांधकाम विभागातून उपलब्ध होतील. निविदा नमुने कोणत्याही परिस्थितीत पोस्टाने पाठविले जाणार नाहीत.

**(३) निविदा सादर करणे :-** निविदा सादर करताना द्विलखोटा पद्धतीने दोन स्वतंत्र लखोट्यात पुढीलप्रमाणे सादर करणेच्या आहेत.

I) **लखोटा क्र. १ :-** (तांत्रिक बोली) सदर लखोट्यावर स्पष्टपणे दिसेल असे ''लखोटा क्र. १'' नमूद करणेचे असून सदर लखोट्यात इसारा रक्कम धनाकर्षाद्वारे/रोखीने भरल्याची मूळ पावती व इतर कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

II) **लखोटा क्र. २ :-** (वित्तीय बोली) सदर लखोट्यावर ''लखोटा क्र. २'' असे स्पष्टपणे नमूद करणेचे असून त्यामध्ये नगरपरिषदेने पुरविलेली अधिकृत नमुन्यातील पूर्णपणे भरलेली कोणत्याही अटी/शर्ती व खाडाखोड नसलेली निविदा सादर करणेची आहे.

(४) लखोटा क्र. १ व २ सिलबंद करून तिसऱ्या लखोट्यात एकत्रितपणे भरून त्यावर कामाचे नांव, कंत्राटदाराचे नांव व पत्ता इत्यादी नमूद करून मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांचे नांवे दिनांक २४/१२/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत नगरपरिषदेच्या आवक/जावक विभागात सिलबंद निविदा सादर करणेच्या आहेत. विहित मुदतीनंतर आलेल्या निविदा कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाहीत.

(५) प्राप्त झालेल्या निविदांपैकी लखोटा क्र. १ (तांत्रिक बोलीचा लिफाफा) दिनांक २४/१२/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजता उपस्थित ठेकेदार किंवा त्यांचे प्रतिनिधींसमोर निविदा समिती सदस्य यांचेकडून बांधकाम विभागात उघडण्यात येईल. तांत्रिक बोली लिफाफ्यातील कागदपत्रांच्या छाननीनंतर पात्र ठरणाऱ्या ठेकेदारांच्या वित्तीय बोलीचा लिफाफा (लखोटा क्र. २) दोन दिवसांनंतर निविदा समितीने निश्चित केलेल्या वेळेवर निश्चित केलेल्या ठिकाणी उपस्थित ठेकेदार किंवा त्यांचे प्रतिनिधींसमोर उघडण्यात येईल.

(६) कोणतीही एक अथवा सर्वच्या सर्व निविदा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

(७) ठेकेदाराने नगरपरिषदेमध्ये इसारा रक्कम भरणा केल्यानंतर कोणत्याही कामाची निविदा नगरपरिषदेकडे दाखल न केल्यास इसारा रक्कम परत मिळणार नाही.

(८) निविदा सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर अथवा निविदा स्विकृतीनंतर निविदेतील तपशीलात आवश्यकता वाटल्यास फेरफार, कमी/जास्त करणेचा अधिकार नगरपरिषदेस राहील.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद**



### जाहीर नोटीस

मा. राव साहेब कोर्ट
अ‍ॅड. जी. आर. कडव
अ‍ॅड. प्रणाली सोहनी

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दिवाणी चौकशी अर्ज नं. १७१०/२०२१
नि. ८/ड
ने.ता. १९/०१/२०२२

१. श्री. प्रबळ अंबरनाथ मढवी
वय-३५ वर्षे, धंदा नोकरी
२. श्रीमती लिला अंबरनाथ मढवी
वय-५८ वर्षे, धंदा-गृहिणी
अर्जदार नं. १ व २ रा. उलवे
ता. पनवेल जि. रायगड
३. सौ. सरिता भगवान कडू
वय-४० वर्षे, धंदा-गृहिणी
रा. केळवणे ता. पनवेल जि. रायगड
४. सौ. प्रतिक्षा प्रमोद भोपी
वय-३७ वर्षे, धंदा-गृहिणी
रा. सांगडे ता. पनवेल जि. रायगड — अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं. १, ३ व ४ यांचे वडिल व अर्जदार नं. २चे पती कै. अंबरनाथ दुकल्या मढवी हे ता. २८/७/२०२१ रोजी मौजे दिघोडे ता. उरण जि. रायगड येथे निधन झाले असून त्यांना अर्जदार १ ते ४ असे सर्वजण त्यांचे कायदेशीर वारस आहेत कै. अंबरनाथ दुकल्या मढवी यांचे नांवे असलेल्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**परिशिष्ठ 'अ'**

| गांव | यु.के.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|---|
| १. उलवे | ६१ | ६९ | ७ | | ०-३०-० |
| २. उलवे | १०६ | ६९ | ६ | | ०-३२-२ |
| | | | | वर्कस | ०-६८-० |
| | | ८३ | ४ | | ०-३२-० |
| | | ८४ | ५ | | ०-६६-० |
| | | ८६ | ५ | | ०-६२-० |
| | | ९२ | ४ | | ०-७८-० |
| | | | | वर्कस | ०-०१-० |
| | | | | | ३-३९-२ |

**परिशिष्ठ 'ब'**

| बांधकाम क्र. | संपादित क्षेत्र | बांधकामाचा वापर | पात्रता चौ.मी. | भूखंड वाटप स्थळ |
|---|---|---|---|---|
| UL-634,A,B | १०९.७९ | निवासी | ३३० | उलवे |

येणेप्रमाणे मिळकती असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने सिडकोकडून कै. अंबरनाथ दुकल्या मढवी यांस गांवठाण विस्तार योजने अंतर्गत भूखंड मिळणार आहेत. सदर भूखंड कै. अंबरनाथ दुकल्या मढवी यांचे पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांस मिळावेत याकरिता अत्यावश्यक तो वारसदाखला मिळावा म्हणून या न्यायालयांत अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आंत या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज ता. १३/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

**सही/-**
**क. लिपिक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायाधिश व. स्तर**
**पनवेल**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **श्री. किसनराव धावजी राठोड** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करून घेण्याकरिता सदर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**
**मौजे - बेलोंडाखार, तालुका - उरण, जिल्हा - रायगड.**

| गट नं. / हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ५/३ | ०-१७-००<br>पो.ख. ०-००-८०<br>**एकूण ०-१७-८०** | २.६२ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १४/१२/२०२१.**

**सही/-**
**अ‍ॅड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
दूरध्वनी क्र. २७४५६३०६



सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना
**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूसंपादन विभागातर्फे साडेबावीस टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना वाटपाबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नोड- पुष्पक नोड (उलवे) | | | | | | | | |
| १ | १२/NUR | मौजे -, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड प्रकरण क्र.३१ | २७७/३<br>२७७/४<br>२७४/१क<br>एकूण क्षेत्र | १-१९-०<br><br><br>१-१९-० | १८८० | पुष्पक नोड उलवे येथील **भूखंड क्र. १३९, सेक्टर २६, क्षेत्र १८८० चौ.मी.** | श्री. बाबु यादवराव देशमुख | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**
**भूसंपादन विभाग, १ ला मजला, सिडको भवन,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अपर जिल्हाधिकारी तथा**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

सिडको/जनसंपर्क/३४४/२०२१-२२

RNI No. MAHBIL/2009/36619

# महाराष्ट्र शासन राजपत्र
## असाधारण भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ७, अंक ५८] शनिवार, डिसेंबर ४, २०२१/अग्रहायण १३, शके १९४३ [पृष्ठे ११, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ८३**

### प्राधिकृत प्रकाशन

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांजकडून**
**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम क्र. ११ ची अधिसूचना**

क्रमांक भूसंपादन/कांत–१/सीआर/२४/२०२१. –ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. ११/२०१४/प्र.क्र. ७७(पार्ट–२)/अ–२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूमी संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकारांस यासोबत जोडलेल्या अनुसूची १ मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त ''सार्वजनिक प्रयोजन'' असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या 'अनुसूची दोन' मध्ये दिलेले आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे यासोबत जोडलेल्या 'अनुसूची तीन' मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या 'अनुसूची चार' मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट–कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या 'अनुसूची चार' मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम ४ च्या अनुसार कोणतीही व्यक्ती ही, अधिसूचना प्रसिद्धी झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही. पंरतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाचा मालकांने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदींच्या प्रर्वतनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदींचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतिची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट–कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१३ (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियम कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांस पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची–एक

**जमिनीचे वर्णन**

गाव गव्हाण, तालुका पनवेल, जिल्हा रायगड

| अ.क्र. (१) | स. नं. हि. नं. (२) | क्षेत्र (हे.आर) (३) |
|---|---|---|
| १ | २०५/१/अ१ | ०-४४-४ |
| २ | २०५/१/अ२ | ०-४१-५ |
| ३ | २०५/१ब | ०-१३-७ |
| ४ | २०५/२ | ०-११-४ |
| ५ | २०५/३ | ०-०६-३ |
| ६ | २०५/५ | ०-०४-८ |
| ७ | २०६/१+२ | ०-७९-७ |
| ८ | २०६/३ | १-२३-५ |
| ९ | २०६/४ | ०-०६-३ |
| १० | २०६/५ | ०-२८-८ |
| ११ | २०६/६ | ०-१८-७ |
| १२ | २२८/१ | ०-३३-० |
| १३ | २२८/२ | ०-३०-० |
| १४ | २२८/३ | ०-१४-० |
| १५ | २२८/४ | ०-६५-० |
| १६ | २२८/६ | ०-२०-० |
| १७ | २२८/८ | ०-०७-० |
| १८ | २२९/२ | ०-०९-०९ |
| १९ | २२९/६अ | ०-१८-४ |
| २० | २२९/६ब | ०-०२-८ |
| २१ | २२९/७ | ०-०४-३ |
| २२ | २२९/८ | ०-०६-१ |
| २३ | २५०/१ | ०-१७-५ |
| २४ | २५०/२ | ०-२६-४ |
| २५ | २५०/३अ | ०-०९-९ |
| २६ | २५०/३क | ०-६६-९ |
| २७ | २५०/४ | ०-११/० |
| २८ | २५०/५ | ०-०४-० |
| २९ | २५०/१० | ०-११-६ |
| ३० | २५०/११ | ०-०९-६ |
| ३१ | २५०/१२ | ०-०७-६ |
| ३२ | २५०/५ | ०-१३-० |
| ३३ | २५४/० | ०-४१/० |
| ३४ | २५५/३ | ०-०७-३ |
| ३५ | २५५/५ | ०-२२-० |
| ३६ | २५५/६ | ०-२५-० |
| ३७ | २५५/८ | ०-१८-३ |
| ३८ | २५५/९ | ०-१३-२ |
| ३९ | २५५/१० | ०-०२-० |
| ४० | २५६/२ | ०-०३-० |
| ४१ | २५६/३ | ०-१०-६ |
| ४२ | २५६/४ | ०-०५-३ |
| ४३ | २५६/६ | ०-०१-३ |
| ४४ | २५६/७ | ०-११-९ |
| ४५ | २५६/९ | ०-२८-० |
| ४६ | २५७/२अ | ०-८१-० |
| ४७ | २५७/४ब | २-३७-० |
| ४८ | २५८/० | ०-०३-५ |
| ४९ | २६३/१ | ०-१३-७ |
| ५० | २६३/५ | ०-५३-५ |
| ५१ | २६४/१ | ०-२७-३ |
| ५२ | २६४/२अ | ०-१९-७ |
| ५३ | २६४/२ब | ०-१८-५ |
| ५४ | २६४/३ | ०-१८-५ |
| ५५ | २६५/१ | ०-५६/५ |
| ५६ | २६५/३ | ०-०४-० |
| ५७ | २६६/१ | ०-७०-० |
| ५८ | २६६/४ | ०-१५-२ |
| ५९ | २६७/३ | ०-१०-० |
| ६० | २६७/४ | ०-२४-० |
| ६१ | २६७/६ | ०-०६-० |
| ६२ | २७०/२ | ०-३०-० |
| ६३ | २७०/३ | ०-४७-० |
| ६४ | २७०/६ | ०-९४-० |
| ६५ | २७०/८ब | ०-२२-० |
| ६६ | २७१/२ | ०-०५-१ |
| ६७ | २७१/४अ | ०-०२-५ |
| ६८ | २७१/५ब | ०-१३-२ |
| ६९ | २७१/६ | ०-०४-८ |
| ७० | २७२/१ | ०-०७-३ |
| ७१ | २७२/२+३ड | ०-२२-४ |
| ७२ | २७२/३अ | ०-२३-९ |
| ७३ | २७२/३ब | ०-१७-५ |
| ७४ | २७२/४ | ०-१२-४ |
| ७५ | २७२/५ | ०-०९-६ |
| ७६ | २७२/६ब | ०-१४-० |
| ७७ | २७२/७ | ०-०७-६ |
| ७८ | २७३/१ | ०-०१-५ |
| ७९ | २७४/६ | ०-६३-० |
| ८० | २७४/१०अ | १-२०-० |
| ८१ | २७४/१०ब | ०-८७-० |
| ८२ | २७५/१ | ०-३०-२ |
| ८३ | २७५/२ | ०-३६-३ |
| ८४ | २७५/३ | ०-३४-३ |
| ८५ | २७५/४ | ०-२८-२ |
| ८६ | २८२/१क | ०-०७-० |
| ८७ | २८३/० | ०-०७-० |
| ८८ | २८४/१६ | ०-०३-० |
| ८९ | २८४/९ | ०-२४-० |
| ९० | २८४/११ | २-०४-० |
| ९१ | २८५/२अ | ०-११-६ |
| ९२ | २८५/२ब | ०-१४-० |
| ९३ | २८५/३अ | ०-००-२ |
| ९४ | २८५/३क | ०-०४-३ |
| ९५ | २८५/४ | ०-१२/२ |
| ९६ | २८५/५ब | ०-०२-३ |
| ९७ | २८६/४ | ०-०८-० |
| ९८ | २८७/७+८ | ०-२०-५ |
| ९९ | २८७/९ | ०-०१-३ |
| १०० | २८७/१० | ०-००-०८ |
| १०१ | २९४/१ | ०-०६-३ |
| १०२ | २९४/२ | ०-०५-१ |
| १०३ | २९४/३ | ०-०४-० |
| १०४ | २९४/४ | ०-०३-० |
| १०५ | २९४/७+९+११ब | ०-०५-० |
| १०६ | २९४/८ | ०-०३-० |
| १०७ | २९४/१२ | ०-०७-१ |
| १०८ | २९५/१ | ०-४१-६ |
| १०९ | २९५/२ब | ०-३०-९ |
| ११० | २९६/१ | ०-३७-१ |
| १११ | २९६/२ | ०-१२-७ |
| ११२ | २९६/३ | ०-२५-० |
| ११३ | २९६/४ | ०-०८-२ |
| ११४ | २९७/१ | ०-०९-० |
| ११५ | २९८/१ | ०-१२-४ |
| ११६ | २९८/२ | ०-३६-२ |
| ११७ | २९८/३ | ०-२०-२ |
| ११८ | २९९/० | ०-०३-५ |
| ११९ | ३००/२ | ०-२५-० |
| १२० | ३००/३अ | ०-१२-० |
| १२१ | ३००/३ब | ०-३२-० |
| १२२ | ३००/४ | ०-१०-० |
| १२३ | ३००/५ | ०-०७-६ |
| १२४ | ३००/६ | ०-०५-६ |
| १२५ | ३००/७ | ०-१४-४ |
| १२६ | ३००/८ | ०-१६-२ |
| १२७ | ३००/९ | ०-०५-० |
| १२८ | ३००/१० | ०-०३-० |
| १२९ | ३०१/१ | ०-११-४ |
| १३० | ३०१/२ | ०-०४-० |
| १३१ | ३०१/३ | ०-०९-४ |
| १३२ | ३०१/४ | ०-०५-३ |
| १३३ | ३०१/५ | ०-१४-४ |
| १३४ | ३०२/० | ०-०२-५ |
| १३५ | ३०३/१ | ०-०१-३ |
| १३६ | ३०३/२ | ०-०३-५ |
| १३७ | ३०८/५ | ०-०५-० |
| १३८ | ३०९/१ | ०-२७-६ |
| १३९ | ३०९/२ | ०-१३-१ |
| १४० | ३०४/१७ | ०-५०-० |
| १४१ | ३०४/२१अ | ०-५४-० |
| १४२ | ३०४/२अ+३०अ+३१अ | ०-२८-० |
| १४३ | ३०४/५ | ०-४८-० |
| १४४ | ३०४/१३ | ०-०३-० |
| १४५ | ३०५/० | ०-०३-८ |
| १४६ | ३०६/७ | ०-१९-० |
| १४७ | ३०६/१२ | १-५९-० |
| १४८ | ३०६/१३अ | ०-३४-२ |
| १४९ | ३०७/१३ब | ०-३६-४ |
| १५० | ३०६/१३क | ०-३६-४ |
| १५१ | ३०७/१/अ/१ | ०-१४-४ |
| १५२ | ३०७/१/अ/२ | ०-१७-२ |
| १५३ | ३०७/१/ब | ०-२६-६ |
| १५४ | ३०७/१/क | ०-०७-३ |
| १५५ | ३०७/२ | ०-०७-८ |
| १५६ | ३०७/३ | ०-३४-९ |
| १५७ | ३०८/१/अ | ०-४७-१ |
| १५८ | ३०८/१/ब | ०-०७-३ |
| १५९ | ३०८/१क | ०-०१-८ |
| १६० | ३०८/२ | ०-०८-० |
| १६१ | ३०८/३ | ०-०२-३ |
| १६२ | ३०८/४ | ०-०६-५ |
| १६३ | ३१९/१ | ०-१८-८ |
| १६४ | ३१९/२ | ०-०४-८ |
| १६५ | ३०९/३/अ | ०-३०-४ |
| १६६ | ३०९/३ब | ०-४३-३ |
| १६७ | ३०९/४ | ०-१२-० |
| १६८ | ३१०/१ | ०-१०-६ |
| १६९ | ३१०/२ | ०-५९-१ |
| १७० | ३१०/३ | ०-०८-१ |
| १७१ | ३१०/४ | ०-०१-३ |
| १७२ | ३१०/५ | ०-१७-७ |
| १७३ | ३१०/७ | ०-२२-३ |
| १७४ | ३१०/८ | ०-०८-१ |
| १७५ | ३११/१ | ०-०३-३ |
| १७६ | ३११/२/अ | ०-१२-० |
| १७७ | ३११/२/ब | ०-१२-१ |
| १७८ | ३११/३ | ०-०४-५ |
| १७९ | ३११/४ | ०-०७-६ |
| १८० | ३११/५अ+९अ | ०-०८-३ |
| १८१ | ३११/५ब | ०-१२-५ |
| १८२ | ३११/६अ+९ब | ०-१०-६ |
| १८३ | ३११/६ब | ०-०९-१ |
| १८४ | ३११/६क | ०-००-२ |
| १८५ | ३११/७ | ०-०४-० |
| १८६ | ३११/८ | ०-०५-८ |
| १८७ | ३१२/१ | ०-०९-० |
| १८८ | ३१२/२ | ०-१०-४ |
| १८९ | ३१२/३ | ०-११-० |
| १९० | ३१२/४ | ०-०२-५ |
| १९१ | ३१२/५ | ०-०३-५ |
| १९२ | ३१२/७ | ०-१०-० |
| १९३ | ३१२/८ | ०-००-२ |
| १९४ | ३१२/९+१० | ०-०२-५ |
| १९५ | ३१२/११ | ०-०२-५ |
| १९६ | ३१२/१२ | ०-०५-३ |
| १९७ | ३१२/१३ | ०-१८-२ |
| १९८ | ३१३/१ | ०-०२-५ |
| १९९ | ३१३/२ | ०-०१-३ |

पान नं. ५ वर...

## संपादकीय

# करेक्ट कार्यक्रम

राज्य विधान परिषदेच्या नागपूर आणि अकोला-बुलडाणा-वाशिम स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणुकांमध्ये अपेक्षेप्रमाणे भारतीय जनता पक्षाने बाजी मारली आणि विधान परिषदेच्या या दोन्ही जागा खेचून घेतल्या. महाविकास आघाडीला ही खूप मोठी चपराक आहे हे तर ओघाने आलेच, पण या पराभवानंतर तरी महाविकास आघाडीचे नेते काही धडा घेतील अशी अपेक्षा आहे.

**नागपूरमध्ये माजी ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी खूप मोठ्या फरकाने विजय मिळवला. तब्बल १७६ जास्त मते घेऊन ते विजयी झाले, तर अकोल्यामध्ये भाजपच्या वसंत खंडेलवाल यांनी शिवसेनेच्या गोपीकिशन बाजोरिया यांना घरी बसवले. बाजोरिया गेल्या तिन्ही वेळेला याच मतदारसंघातून निवडून आले होते. बाजोरियांचा पराभव महाविकास आघाडीच्या निश्चितच वर्मी लागला असेल. महाविकास आघाडीपेक्षाही शिवसेनेच्या विश्वासघातकी राजकारणाचा हा पराभव मानायला हवा. अकोल्यामध्ये महाविकास आघाडीची कित्येक मते फुटली असे सांगितले जाते. एकंदरीत या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला फुटीरांनी चांगलाच दणका दिला आहे असे दिसते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्थानिक राजकारणाबरोबरच इतर अनेक घटक कार्यरत असतात. महाविकास आघाडीमध्ये सर्व ज्येष्ठ नेते एकजुटीने राहून आपापल्या खुर्च्या शाबूत ठेवून आहेत. विधानसभेमध्ये आपली एकजूट कायम ठेवली तर सत्ता टिकून राहील हे या नेत्यांना कळून चुकले आहे. तळागाळातील कार्यकर्त्यांना काय वाटते ते त्यांच्या गावीदेखील नाही. कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेण्यातही त्यांना रस नाही. खुर्च्या टिकवणे हा या सरकारचा एककलमी कार्यक्रम आहे. प्रत्यक्षात तळागाळात मात्र कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. त्याचेच दर्शन या निवडणुकीमध्ये झाले. एकूण सहापैकी चार जागा भारतीय जनता पक्षाने एकहाती पटकाविल्या. त्यापैकी धुळे-नंदुरबारचे आमदार अमरिश पटेल आणि मुंबईतील राजहंस सिंह हे दोन्ही भाजप उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. विदर्भामध्ये शिवसेनेची ताकद कमी असली तरी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने मिळून मोर्चेबांधणी करण्याचा प्रयत्न केला होता, मात्र काँग्रेसमधील अस्वस्थ कार्यकर्त्यांमुळे पराभव पदरात घेण्याची नामुष्की त्यांच्यावर ओढवली. भाजपची कास सोडून काँग्रेसवासी झालेल्या रवींद्र ऊर्फ छोटू भोयर यांना काँग्रेसने उमेदवारी दिली होती, पण ऐन वेळी काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींनी भोयर यांची उमेदवारी रद्द करीत अन्य अपक्ष उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला. परिणामी उमेदवार छोटू भोयर यांना अवघे एकच मत पडले, ते स्वत:चे. बरीचशी मते चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पारड्यात पडली हे तर उघड आहे. हे असे का घडले याचे आत्मपरीक्षण करण्याची गरज काँग्रेस पक्षश्रेष्ठींना वाटली पाहिजे. काँग्रेसचे पक्षाध्यक्ष नाना पटोले यांच्या हुकूमशाही कारभारामुळे असा प्रकार घडला असून त्यांनी ताबडतोब राजीनामा द्यायला हवा अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. याउलट भारतीय जनता पक्षात समाधानाचे वातावरण आहे. कारण संयम आणि निष्ठा या दोन्ही गुणांचे या पक्षात चीज होते हेच बावनकुळे यांच्या विजयावरून स्पष्ट झाले. भारतीय जनता पक्षाचा विधान परिषदेतील विजय ही पुढील विजय पर्वाची नांदी आहे, असे सूचक उद्गार माजी मुख्यमंत्री व विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी काढले. त्यात आगामी निवडणुकांसाठी भाजप किती तयारीत आहे याची चुणूक दिसते. एकंदरीत भाजपने महाविकास आघाडीचा 'करेक्ट कार्यक्रम' निवडणुकीच्या रिंगणातच केला असे म्हणावे लागेल.**

# स्वमग्न जतीन करतोय गणितामध्ये पीएचडी

जतीन आठवीत असताना एक दिवस मी अभ्यास घेत होते, तेव्हा त्याने मला सांगितले, आई मला ना वर जायचे आहे. त्या वेळी आम्ही राहत असलेल्या इमारतीच्या वरच्या मजल्यावर संस्कृतचा क्लास होता. मी त्याला विचारले, तुला जोशी सरांकडे जायचे आहे का? तो म्हणाला, नाही, मला ना खूप त्रास होतोय. असं, वाटतं की मरून जावे. हा माझ्यासाठी खूप मोठा शॉक होता. तो सहा महिने खूप डिप्रेशनमध्ये गेला. मग मात्र मी त्याची शाळा बदलण्याचे ठरवले. त्या वेळी पनवेलमध्ये कोणत्याच शाळेने त्याला प्रवेश दिला नाही. आज तोच जतीन गणितात मास्टर पदवी घेऊन पीएचडीची तयारी करीत असल्याची माहिती त्याची आई अर्चना पाटील यांनी दिली.



**खबरबात**
**नितीन देशमुख**

जतीन सुरेश पाटीलला ३० च्यावर शिष्यवृत्ती आहेत. त्यामध्ये त्याने राज्यातही नंबर पटकावले आहेत. एनटीएसमध्येही यश मिळवले. एसएससीला ९१ टक्के गुण मिळाले. किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना परीक्षेत १२ वीत तो अपंगांमध्ये देशात पहिला आला. आयआयटी प्रवेश जेईई परीक्षेत अपंगांमध्ये देशात १६ वा आला. हे सगळे यश त्याने आपल्या न्यूनतेवर मात करून मिळवले आहे. त्याला ऑटिझम म्हणजे स्वमग्नता हा आजार आहे. स्वमग्नता हा एक प्रकारचा मनोविकार म्हणून ओळखला जातो. याचे पूर्ण नाव सायकोन्यूरोलॉजिकल डेव्हलपमेंटल डिसऑर्डर असे आहे. इंग्रजीत त्याला 'ऑटिझम' म्हणतात. ही एक गुंतागुंतीची मानसिक स्थिती आहे. स्वमग्नता वा ऑटिझम ही जन्मस्थ अवस्था आहे. तो रोग नाही. याचा शोध लिओ केनर यांनी सन १९४३मध्ये लावला. अशी व्यक्ती आपल्याच विश्वात आणि विचारात रममाण असतात. अशा व्यक्ती संवेदनांचे अर्थ लावू शकत नाहीत. त्यामुळे त्यावर प्रतिक्रिया देता येत नाही. स्वमग्नता हे विकाराचे एक लक्षण आहे. परंतु हे एक लक्षण म्हणजे पूर्ण विकार असे म्हणता येणार नाही म्हणून ही गुंतागुंतीची मानसिक स्थिती आहे असे म्हणतात. कारण ऑटिझम होण्याचे काही एक कारण नाही. संशोधनानुसार ऑटिझम होण्याचे अनेक कारणे असू शकतात, जसे की मस्तिष्कच्या कार्यवाहीत असामान्यता होणे, मस्तिष्कच्या रसायनमध्ये असामान्यता, जन्माआगोदर बाळाचा विकास व्यवस्थित न होणे इत्यादी.

जतीनचे वडील सुरेश पाटील वकील आहेत तर आई अर्चना प्राध्यापक होती. त्यांना दोन मुले मोठी मुलगी रश्मी कर्णबधीर आहे. तिने नृत्य योगा शिकले असून ४० पेक्षा जास्त स्टेज शो केले आहेत. जतीन दीड वर्षाचा असताना त्याला ऑटिझम असल्याचे समजले. तो वर्षाचा झाला तरी काही प्रतिसाद देत नाही, पण काय प्रॉब्लेम आहे ते समजत नव्हते. तो आवाज झाला तरी झोपेतून उठत असे. त्यामुळे ऐकायचा प्रॉब्लेम नव्हता मग काय आहे. कारण २२ वर्षापूर्वी ऑटिझम फारसा कोणाला माहीत नव्हता. तो तीन-साडेतीन वर्षाचा होईपर्यंत बोलत नव्हता, पण खूप हायपर होता. त्याला व्ही. के. च्या बालवाडीत घातला. त्या वेळी तो ऐकायचा नाही, बोलायचा नाही. कोठेही धावायचा किंवा खेळतच बसायचा. त्या वेळी निकालानंतर शिक्षकांनी त्याच्या आईला विचारले होते, याला पुन्हा त्याच वर्गात ठेवायचे का? पण आईने सांगितले की, आपण त्याला पुढच्या वर्गात बसवून बघू या.

अर्चना पाटील यांनी मुलीसाठी कर्णबधिर मुलांच्या पालकांसाठीचा कोर्स केला होता. त्याचा उपयोग सुट्टीत याच्यावर केला. त्यानंतर मोठा शिशूमध्ये तो बोलायलाच लागला नाही, तर ९७ टक्के मार्क मिळवून शाळेत पहिला आला. तिथून जतीनने मागे वळून पाहिले नाही. दुसरा नंबर कायम होता. त्याचे मार्क चित्रकला आणि शारीरिक शिक्षण या विषयांमध्ये जायचे, पण त्याने कधी मागे वळून पाहिले नाही.

शाळेत शिक्षक इतर मुलांच्या पालकांना जतीनबाबत सांगत. ते पालक आपल्या मुलांना बोलल्यावर मुले शाळेत जतीनवर राग काढत, त्याला मारत, पण जतीनला यामागचे कारण कळत नसे. अशा (स्वमग्न) मुलांना प्रेम काय असते, आनंद काय असतो हे शिकवावे लागते. त्यांना या गोष्टी समजल्या तरी सांगता येत नाहीत. 'तारे जमीन पर' सिनेमा पाहिल्यावर जतीन खूप रडला. तेव्हापासून त्याला समजायला लागले. त्यानंतर तो रिॲक्ट व्हायला लागला. शिक्षकांकडूनही त्याला खूप टोमणे ऐकावे लागायचे. आठवीत त्याने 'मला ना, खूप त्रास होतोय. असं, वाटतं की मरून जावं' असे सांगितल्यानंतर तो सहा महिने खूप डिप्रेशनमध्ये होता. मग त्याची शाळा बदलण्याचे ठरवले पनवेलमध्ये कोणत्याच शाळेने त्याला प्रवेश दिला नाही. वाशीला फादर ॲग्नल्स शाळेने त्याची परीक्षा घेऊन त्याला प्रवेश दिला. त्या शाळेत नववीत असताना त्याला होमी भाभा परीक्षेत सुवर्ण पदक मिळाले.

किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना परीक्षेत १२ वीत जतीन अपंगांमध्ये देशात पहिला आला. त्याचा अभ्यास तोच करतो. त्याच्या बहिणीला, रश्मीला ऐकायला येत नसल्याने लिप रीड करते. तिचा आभ्यास अर्चना पाटील घ्यायच्या. त्या वेळी तो बसलेला असायचा. त्यामुळे शाळेत शिकवायच्या आधीच रविवारी त्याची प्रवेश परीक्षा आहे. जतीनचा हा प्रवास सोपा नव्हता. त्याला माणसं ओळखणे अजूनही जमत नाहीत. त्याच्या ते लक्षात राहात नाही.

जतीनची आई सांगते, पाच वर्षे तो हॉस्टेलमध्ये एकटा राहातो. पनवेलहून एकटा पुण्याला जातो. तेथील त्याच्या मित्रांना फारसे माहीत नाही की, याला ऑटिझम आहे. तो बंगलोरला जाताना त्याला सोडायला आम्ही स्टेशनवर गेलो होतो. त्या वेळी जतीनच्या मित्रांना ऑटिझमविषयी सांगितले. त्यांनी आम्हाला सांगितले की, 'जतीन आमचा मित्र आहे, या पलीकडे आम्हाला काही जाणून घ्यायचे नाही.' हा माझ्यासाठी खूप

> ***ऑटिझम झालेल्या मुलांच्या पालकांचा नेहमी शैक्षणिक कार्यावर भर असतो, पण त्यांनी मुलांना नेहमी गरजेची असलेली त्यांची स्वत:ची कामे स्वत: करता येणे यावर आधी भर द्यावा. शैक्षणिक कार्य महत्त्वाचे आहे यात शंका नाही, पण हे त्याला आलेच पाहिजे असे करू नका. त्याच्यावर दबाव आणल्यास तो जे करणार असतो त्याच्या २५ टक्केच करतो. जे त्यांच्यात आहे, ते ओळखा त्याच्यात त्यांना प्रोत्साहन द्या. जेणेकरून त्यांच्या पुढच्या आयुष्यासाठी त्याचा उपयोग होईल.***
> ***-अर्चना पाटील***

जतीनचा आभ्यास झालेला असायचा. फक्त दहावीच्या परीक्षेत आम्ही त्याला वेळ वाढवून मिळवण्याचा अर्ज केला होता. १२ वीच्या परीक्षेनंतर त्याला काही पदार्थ कसे बनवायचे, पॅकिंग कसे करायचे, स्वतःची काळजी काशी घ्यायची हे शिकवले. आयआयटी प्रवेश जेईई परीक्षेत अपंगांमध्ये जतीन देशात १६वा आला. एनटीएस शिष्यवृत्ती मिळाली होती. त्यांचे वर्कशॉप पुण्याला आयशरमध्ये होते. तेथून आल्यावर जतीनने आपण तिथेच जायचे असे ठरवले. भौतिकशास्त्रात त्याला पदवी घ्यायची होती, पण सहा महिन्यात विचार बदलून आता जतीनने गणितामध्ये मास्टर पदवी मिळवली. हे मास्टर पीएचडीच्या लेव्हलचे असते. त्यात जतीनला ८० टक्के मार्क मिळाले. पुढे त्याला पीएचडी करायचे आहे. मोठा सपोर्ट होता. जतीनने आपला मास्टरचा प्रबंध पालकांना आणि सोबतच्या मित्रांना अर्पण करून त्यांचे आभार मानले आहेत.

रश्मी, जतीन या बहीण-भावाचे चांगले जमते. जतीन चपातीपासून केक, पाव भाजी, वडापाव सगळे बनवायला शिकला. त्याला काय आवडते, हे रश्मीला चांगले समजते. कर्णबधिर मुलगी आणि ऑटिझम झालेला मुलगा यांना अर्चना पाटील यांनी कोणताही न्यूनगंड न बाळगता शिकवले. स्वतःच्या पायावर उभे केले. रश्मीने नृत्यात आणि पाककलेत यश मिळवले, तर जतीन आज गणितात मास्टर होऊन पीएचडीसाठी प्रवेश घेतोय. त्यामुळेच अर्चना पाटील यांच्याबद्दल म्हणावेसे वाटते, 'धन्य ती माऊली.'

# रोह्यात स्व. गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा वंजारी सेवा संघातर्फे रविवारी रोह्यातील श्री क्लासेस येथे भाजप नेते स्व. गोपीनाथ मुंडे यांचा जयंती उत्सव कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी मान्यवरांनी आदरांजली वाहून स्व. मुंडे यांना अभिवादन केले. या कार्यक्रमाचे आयोजन श्री क्लासेसचे प्राचार्य मुंडे यांनी केले होते.



(छाया : धम्मशील सावंत)

वंजारी सेवा संघाचे रायगड जिल्हा अध्यक्ष गोरख आघाव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघाचे रायगड जिल्हा सचिव नितीन दहिफळे यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थी परिषदेचे प्रतिनिधी ते केंद्रीय मंत्रिपदापर्यंत गोपीनाथ मुंडे यांनी मारलेली मजल व संघर्षाचा इतिहास गोरख आघाव यांनी सांगितला.

वंजारी सेवा संघाचे कोकण विभागीय अध्यक्ष नितीन गर्जे, प्रदेश चिटणीस प्राचार्य मुंडे, विभागीय चिटणीस बाबासाहेब मोराळे, मोहन दहिफळे, यांच्यासह जिल्ह्यातील बहुतांश समाज बांधव या कार्यक्रमाला उपस्थित होते. संघाचे विभागीय सचिव बाळासाहेब बडे यांनी आभार मानले.

# प्रमोद जाधव यांना वनमित्र पुरस्कार प्रदान

**अलिबाग : प्रतिनिधी**

सिंधुदुर्ग जिल्ह्याचे समाजकल्याण उपायुक्त प्रमोद जाधव (मूळ रा. चरी, ता. अलिबाग) यांना पुणे येथील वैद्य खडीवाले वैद्यक संशोधन संस्थेतर्फे डॉ. वा. द. वर्तक वनमित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रमोद जाधव यांच्या वनस्पती क्षेत्रातील कामगिरीची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पुण्याच्या धन्वंतरी हॉलमध्ये रविवारी झालेल्या कार्यक्रमात प्रमोद जाधव यांना वनमित्र पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी महाराष्ट्रातील मान्यवर आयुर्वेद तज्ज्ञ व अभ्यासक उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रमोद जाधव यांच्यासह राज्यभरातील १२ वैद्यांनाही विविध पुरस्काराने सन्मानित केले गेले.



शासकीय अधिकारी पदावर कार्यरत असतानाच प्रमोद जाधव यांनी आयुर्वेद क्षेत्राला पोषक असे काम सुरूच ठेवले. जाधव यांनी लाल भाताचे ३२ प्रकार त्यांचा शोध, जतन व संवर्धन तसेच लाल भातातील औषधी गुणधर्म यावर लेखन केले आहे. भातासाठीचे वेगवेगळे प्रयोग, विविध जंगली वनस्पती, फळझाडे यांचा शोध या अनुषंगाने वैज्ञानिक स्वरूपाचे लेख, जलसंधारणमधील कार्य, जलसुरक्षा विषयाच्या पाठ्यपुस्तक निर्मितीमधील योगदानाची दखल वैद्य खडीवाले वैद्यक संशोधन संस्थेने घेतली आहे. जाधव हे महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या (बालभारती) जलसुरक्षा विषयाच्या अभ्यास गटाचे सदस्य आहेत. गेल्या वर्षी झालेल्या विश्वनाथ परिषदेत त्यांनी सादर केलेल्या कोकणातील भातपिकांवरील जैववैविध्य व संवर्धन या शोधनिबंधाला ब्राँझपदक मिळाले आहे. ५६ पारंपारीक बियाणे, १० जंगली झाडे, सहा क्षार सहनशील झाडे, ४२ फळझाडे, सात औषधी वनस्पती अशा १२१ दुर्मिळ व वैशिष्ट्यपूर्ण वनस्पतींचे संवर्धन केले आहे. मुंबई विद्यापीठाच्या राज्यस्तरीय परिषदेत भारताचे जलपुरूष डॉ. राजेंद्र सिंह यांच्या उपस्थितीत जाधव यांनी अल्पखर्ची पाषण तलाव या संकल्पनेचे सादरीकरण केल. त्याला ब्राँझपदक मिळाले.

# तळोजा मजकूर येथे सांगीतिक सप्ताह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सद्गुरू वामनबाबा महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तळोजा मजकूर येथे श्रीदत्त जयंती सप्ताहानिमित्त दररोज श्रीगुरुचरित्राचे पारायण व भगवतधर्म सांप्रदायातील थोर विचारवंतांची कीर्तने व महाराष्ट्रातील नामवंत कलाकारांच्या भजनादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्याचे उद्घाटन योगिराज यशवंत महाराज, तसेच सांस्कृतिक सेलचे पनवेल तालुका अध्यक्ष रायगडभूषण उमेश चौधरी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून हभप कर्वे, हभप संतोषबुवा पाटील, हभप अशोक पाटील, तबलावादक निषाद पवार, सोमनाथ पाटील, आदित्य पाटील आदी उपस्थित होते.

दररोज होणाऱ्या कार्यक्रमात हभप संदीप महाराज शिंदे (हासेगावकर), हभप किशोर महाराज खरात (सिन्नर), हभप विश्वनाथ महाराज वारिंगे (पाले), या महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने, तसेच गायक उमेश चौधरी, नागेश आडगावकर, सुरमणी भाग्यश्री देशपांडे, सारेगमप फेम महेश कंठे, गणेश गोंधळी यांच्या श्रवणाचा रसिक श्रोत्यांना लाभ मिळणार आहे. या सर्व कार्यक्रम सप्ताहाचा जास्तीत जास्त भक्तगणांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक हभप कैवारी पाटील यांनी केले आहे.



# मारहाणप्रकरणी आरोपीला शिक्षा

**खालापूर : प्रतिनिधी**

क्षुल्लक कारणावरून फिर्यादी व त्यांच्या पत्नीस मारहाण केल्याप्रकरणी आरोपी यशवंत हिरू कांबळे याला खालापूर येथील सह न्यायदंडाधिकारी पी. एम. माने यांनी दोन हजार रुपये दंड व चांगल्या वर्तणुकीचे हमीपत्र देण्याची शिक्षा सुनावली आहे.

फिर्यादी जगन्नाथ भाबू मोरे हे १३ फेब्रुवारी २०१४ रोजी संध्याकाळी त्यांच्या घरासमोर उभे असताना क्षुल्लक कारणावरून आरोपी यशवंत हिरू कांबळे (वय ५१, रा. यशवंतनगर खोपोली) याने त्यांना विटेने व काठीने मारहाण केली. त्या वेळी फिर्यादी यांची पत्नी भांडण सोडविण्यास आली असता आरोपीने त्यांना हाता, बुक्याने मारहाण केली. याबाबत जगन्नाथ मोरे यांनी खोपोली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती.

तपासी अंमलदार विजय दादासाहेब मूळ यांनी तपास पूर्ण करून खालापूर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. या खटल्यात अभियोग पक्षातर्फे एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आले. त्यात फिर्यादीची पत्नी व वैद्यकीय अधिकारी डॉ. चव्हाण यांच्या साक्षी महत्वपुर्ण ठरल्या. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीस दोषी ठरविले आणि भादंवी कलम ३२४ व ३२३ अन्वये रु २००० दंड तसेच पाच हजार रुपयांचे एक वर्षाचे चांगल्या वागणुकीचे हमीपत्र देणे अशी शिक्षा सुनावली. आरोपीकडून जमा झालेल्या दंडाच्या रकमेमधील प्रत्येकी पाचशे रुपये फिर्यादी व त्याच्या पत्नीस देण्यात आले. या खटल्यात अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील ॲड. कल्पना फोडके यांनी काम पाहिले.

# महाडच्या ममता बागेवाडी ठरल्या स्वावलंबन क्वीन किताबाच्या मानकरी

**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबईतील स्वावलंबन फाउंडेशन या संस्थेतर्फे 'स्वावलंबन क्वीन-२०२१' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या राज्यस्तरीय स्पर्धेची महाअंतिम फेरी कर्जतमध्ये घेण्यात आली. त्यामध्ये महाडच्या ममता बागेवाडी 'स्वावलंबन क्वीन-२०२१'च्या मानकरी ठरल्या.

स्वावलंबन संस्थेने राज्यातील पुणे, मुंबई, नाशिक, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, उस्मानाबाद आदी जिल्ह्यातील महिलांना परीक्षण देऊन त्यांची ऑनलाइन परीक्षा घेतली होती. यामध्ये सुमारे दोनशे महिला स्पर्धकांनी भाग घेतला होता. त्यामधील ८० स्पर्धकांची महाअंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली होती. कर्जत तालुक्यातील पोसरी परिसरातील 'वसंत सृष्टी' च्या खुल्या सभागृहात महाअंतिम फेरीचा सोहळा आयोजित करण्यात आला होता. नूतन




(छाया : विजय मांडे)

मिस्त्री, सीमा देसाई-नायर, जान्हवी असलेकर, विद्या गोकर्णकर, कावेरी पिंपळे आणि वैशाली धूत यांनी परीक्षक म्हणून कामगिरी बजावली.

अंतिम फेरीनंतर पारितोषिक वितरण सोहळ्यास सुरुवात झाली. संस्थेचे अध्यक्ष संजय पोवळे व सचिव विभा परब यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आदिवासी मुलांच्या उत्कर्षासाठी कार्य करणाऱ्या ठमाताई पवार, प्रिया नागोठकर आणि शीतल कुंभार यांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. मृदुला गडणीस यांनी मनोगत व्यक्त केले.

महाडच्या ममता बागेवाडी या स्वावलंबन क्वीन-२०२१ च्या विजेत्या ठरल्या तर उपविजेत्या म्हणून कोमल पारेख (पुणे) व संपदा कुलकर्णी (महाड) यांची निवड झाली. त्यांना विभा परब यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

शार्दूला कुलकर्णी आणि सुवर्णा काकुसते यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. अभिनेत्री प्रिया अरुण, वंदना दराडे, डॉ. ज्योती सातपुते, नीलम कदम, हर्षदा कडू, मनीषा सुर्वे, पूजा इंदुलकर, अंजली ब्रह्मे, अपर्णा खोत, सोनाली कोदे, सोनाली नाईक, अर्चना हेंदळेकर आदींसह स्पर्धक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# घोडीवली-बीड खुर्द रस्त्यासाठी ग्रामस्थ आक्रमक

## खालापूर तहसीलदार, गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

**खालापूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील घोडीवली-बीड खुर्द रस्त्याची दुरवस्था झाली असून, या रस्त्याचे काम त्वरित सुरू करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मंगळवारी (दि. १४) खालापूरचे तहसीलदार व गटविकास अधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे.



(छाया : अरुण नलावडे)

खालापूर तालुक्यातील बहुतांशी रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. त्यामुळे वाहन चालकांसह पादचारी, प्रवाशांना मोठ्या समस्यांला सामोरे जावे लागत आहे. तालुक्यातील घोडीवली फाटामार्गे नावंढे, केळवली, वणी, बीड, जांबरुंग, खरवई, डोलवली हा रस्ता खड्ड्यांच्या विळख्यात सापडला आहे. या मार्गावरील काही मोऱ्यांना मोठी भगदाडे पडली आहेत. प्रशासन मात्र त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने दररोज या रस्त्यावर लहान, मोठे अपघात घडत असतात. तसेच वाहन चालकांसह प्रवाशांना अनेक शारीरिक व्याधी जडल्या असून काहींना कंबरदुखी, मानदुखीचा त्रास सुरू झाला आहे. त्यामुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. घोडीवली-बीड खुर्द रस्त्याबाबत प्रशासनाला जागे करण्यासाठी पंचक्रोशीतील सर्व पक्षीय नेते व ग्रामस्थांनी एकत्र येत मंगळवारी खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी, गटविकास अधिकारी शिंदे व चोपडे यांना निवेदन दिले. यावेळी निवृत्ती पिंगळे, अक्षय पिंगळे, प्रशांत खांडेकर, सचिन कर्णुक, प्रसाद पाटील, रमेश खांडेकर, धनाजी फराट, सुरेश देशमुख, किरण हाडप, प्रकाश पिंगळे, पंडित हाडप, नवज्योत पिंगळे, अंकुश पिंगळे, स्वप्निल फराट, समाधान दिसले यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

घोडीवली-बीड खुर्द रस्त्याचे काम त्वरित त्वरित सुरू न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

**घोडीवली-बीड खुर्द रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाल्याने येथून प्रवास करणे अवघड झाले आहे. या रस्त्याचे नुतनीकरण करणे गरजेचे आहे. प्रशासनाने याचे गांभीर्य लक्षात घेत या रस्त्याचे काम त्वरित सुरू करावे, नाहीतर प्रशासनाला ग्रामस्थांच्या आक्रोशाला सामोरे जावे लागेल.**
**-निवृत्ती पिंगळे, ग्रामस्थ व भाजप नेते, घोडीवली, ता. खालापूर**

# रोह्यातील शाळांना 'आपुलकी'ची मदत

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील पन्नासपेक्षा अधिक शाळांना आपुलकी संस्थे तर्फे नुकताच शैक्षणिक व क्रीडा साहित्य तसेच विद्यार्थ्यांना पुस्तक संच यांचे वाटप करण्यात आले.

कोरोना काळातील ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा मोबाईल वापर वाढला आहे. अवांतर वाचन आणि मैदानी खेळ खेळण्याचे प्रमाण कमी झाले आहे. विद्यार्थ्यांनी मैदानी खेळ खेळावेत यासाठी आपुलकी संस्थेने रोहा तालुक्यातील पन्नासपेक्षा अधिक शाळांमध्ये बॅट, बॉल, हँडबॉल, सापशिडी, लगोरी, स्किपिंग रोप्स, हँडरिंग, लेझीम आदी साहित्य तसेच पुस्तक संच यांचे वाटप केले. यावेळी स्पंदन संस्थेच्या अध्यक्षा स्नेहा आंबरे व उपस्थित शिक्षकांनी आपुलकी संस्थेच्या कोषाध्यक्ष माधुरी बेंद्रे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. आपुलकी संस्थेचे अध्यक्ष किशोर सोमण, विश्वस्त शेखर सप्रे, भरतशेठ जैन तसेच स्वाती ताम्हाणे, शुभम ताम्हाणे, कार्यवाह नंदकुमार नलावडे, जितेंद्र जोशी यांच्यासह विविध शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.



(छाया : महादेव सरसंबे)

पान ३ वरून

| अ.क्र. (१) | स. नं. हि. नं. (२) | क्षेत्र (हे.आर) (३) |
|---|---|---|
| २०० | ३१३/३ | ०-१६-९ |
| २०१ | ३१३/४ | ०-०६-८ |
| २०२ | ३१३/५ | ०-०४-८ |
| २०३ | ३१३/६ | ०-०१-३ |
| २०४ | ३१३/८ | ०-१०-६ |
| २०५ | ३१३/९ | ०-२८-६ |
| २०६ | ३१४/२ | ०-०९-७ |
| २०७ | ३१४/३ | ०-१२-० |
| २०८ | ३१६/० | ०-३५-० |
| २०९ | ३१७/१ | ०-१९-० |
| २१० | ३१७/२ | ०-११-६ |
| २११ | ३१७/३ | ०-०६-८ |
| २१२ | ३१८/१ | ०-०७-८ |
| २१३ | ३२६/५क | ०-०८-६ |
| २१४ | ३२७/५क | ०-१७-२ |
| २१५ | ३१९/३ | ०-०४-० |
| २१६ | ३१९/४अ | ०-११-६ |
| २१७ | ३१९/४ब+५ | ०-१३-७ |
| २१८ | ३१९/६ | ०-०३-८ |
| २१९ | ३१९/७ | ०-०६-० |
| २२० | ३१९/८ | ०-०७-६ |
| २२१ | ३१९/९ | ०-०५-० |
| २२२ | ३१९/१० | ०-१५-२ |
| २२३ | ३१९/११ | ०-१७-५ |
| २२४ | ३२०/१अ | ०-०१-५ |
| २२५ | ३२०/१ब | ०-११-६ |
| २२६ | ३२०/२अ+६ | ०-२०-० |
| २२७ | ३२०/२ब | ०-०९-४ |
| २२८ | ३२०/३ | ०-१६-३ |
| २२९ | ३२०/४ | ०-२८-७ |
| २३० | ३२०/५ | ०-०१-० |
| २३१ | ३२१/१ | ०-१२-४ |
| २३२ | ३२१/२अ | ०-२१-० |
| २३३ | ३२१/२ब | ०-१२-६ |
| २३४ | ३२१/३अ | ०-१५-० |
| २३५ | ३२१/३ब | ०-१४-९ |
| २३६ | ३२१/४ | ०-२५-९ |
| २३७ | ३२१/५ | ०-०६-८ |
| २३८ | ३२१/६ | ०-१०-४ |
| २३९ | ३२१/७ | ०-०१-३ |
| २४० | ३२१/८ | ०-१२-१ |
| २४१ | ३२२/१ | ०-०४-० |
| २४२ | ३२३/१ | ०-१०-७ |
| २४३ | ३२३/२/१ | ०-०५-० |
| २४४ | ३२३/२/२ | ०-०४-० |
| २४५ | ३२३/२/३ | ०-०४-० |
| २४६ | ३२३/२/४ | ०-०४-१ |
| २४७ | ३२३/२/५ | ०-२८-२ |
| २४८ | ३२५/१अ/१ | ०-२२-० |
| २४९ | ३२५/३ | ०-६०-१ |
| २५० | ३२५/४ | ०-०५-३ |
| २५१ | ३२५/१ब | ०-१३-१ |
| २५२ | ३२५/१अ/२ | ०-२१-९ |
| २५३ | ३२५/२अ | ०-१८-४ |
| २५४ | ३२५/२ब | ०-६१-० |
| २५५ | ३२६/१ | १-३०-५ |
| २५६ | ३२६/२अ/१ | ०-१७-९ |
| २५७ | ३२६/२अ/२ | ०-१८-० |
| २५८ | ३२६/२ब | ०-०१-० |
| २५९ | ३२६/२क | ०-०१-८ |
| २६० | ३२६/२ड | ०-०२-८ |
| २६१ | ३२६/३अ | ०-११-१ |
| २६२ | ३२६/३ब/१ | ०-२५-३ |
| २६३ | ३२६/३ब/२ | ०-०१-० |
| २६४ | ३२६/३ब/३ | ०-११-१ |
| २६५ | ३२६/३क | ०-०१-० |
| २६६ | ३२६/४ | ०-०१-४ |

| अ.क्र. (१) | स. नं. हि. नं. (२) | क्षेत्र (हे.आर) (३) |
|---|---|---|
| २६७ | ३२६/५अ | ०-१२-६ |
| २६८ | ३२६/५ब | ०-१९-७ |
| २६९ | ३२६/२क | २-३८-३ |
| २७० | ३११/अ२ | ०-००-५ |
| २७१ | ३५४/० | ०-०७-६ |
| २७२ | ३५५/० | ०-१७-२ |
| २७३ | ३५६/३ | ०-१४-० |
| २७४ | ३५६/४ | ०-१२-० |
| २७५ | ३२७/१ड | ०-२७-० |
| २७६ | ३२७/१३क | ०-०१-० |
| २७७ | ३२७/१३ड | ०-०४-० |
| २७८ | ३२८/१ | ०-१८-४ |
| २७९ | ३२८/२ | ०-०६-१ |
| २८० | ३२८/३ | ०-०७-१ |
| २८१ | ३२८/४ | ०-१०-४ |
| २८२ | ३२८/५ | ०-०६-३ |
| २८३ | ३२८/६ | ०-०६-३ |
| २८४ | ३२९/१ | ०-२३-० |
| २८५ | ३२९/२अ | ०-१०-७ |
| २८६ | ३२९/२ब | ०-१६-८ |
| २८७ | ३२९/३ | ०-१८-३ |
| २८८ | ३३२/२क | ०-०२-७ |
| २८९ | १४/४ | २-५३-० |
| २९० | १६/५अ | ०-१५-० |
| २९१ | ३५६/६ | ०-०९-० |
| २९२ | ३५६/७ब | ७-७३-५ |
| २९३ | ३५६/१० | ०-०८-० |
| २९४ | ३५६/२ | ०-१२-० |
| २९५ | ३६०/१अ+१ब+१ड | ०-६८-० |
| २९६ | ३६०/२ब/१ | १-५३-२ |
| २९७ | ३६०/२ब/२ | ०-८५-० |
| २९८ | ३४२/० | ०-४६-८ |
| २९९ | ३४९/६ब | ०-२९-० |
| ३०० | ३५१/३ | १-०४-० |
| ३०१ | ३५१/४ | ०-४०-० |
| ३०२ | ३००/११ब | ०-६१-० |
| ३०३ | १७/८अ | ०-२४-५ |
| ३०४ | १७/८ब | ०-२०-७ |
| ३०५ | २७३/३ | ०-२३-८ |
| ३०६ | २९०/३ब | ०-०१-८ |
| ३०७ | २९०/३क | ०-२६-६ |
| ३०८ | २२५/८ब | ०-४१-० |
| ३०९ | २२८/५ | ०-०७-० |
| ३१० | २५०/६ | ०-०७-० |
| ३११ | २५०/७ | ०-०३-० |
| ३१२ | २५०/८ | ०-०२-३ |
| ३१३ | २५०/९ | ०-०५-० |
| ३१४ | २५१/३ | ०-०९-६ |
| ३१५ | २५५/१ | ०-६७-२ |
| ३१६ | २५५/४ | ०-०७-८ |
| ३१७ | २५५/७ | ०-११-७ |
| ३१८ | २५५/११ | ०-१०-५ |
| ३१९ | २६३/२ | ०-१०-४ |
| ३२० | २६३/३ | ०-४३-० |
| ३२१ | २६३/४ | ०-०३-८ |
| ३२२ | २६५/२ | ०-३६-६ |
| ३२३ | २६७/२ | ०-७७-० |
| ३२४ | २६७/५ | ०-२५-० |
| ३२५ | २६७/७ | ०-२४-० |
| ३२६ | २६८/१ | ०-१७-२ |
| ३२७ | २६८/२ | ०-००-३ |
| ३२८ | २७४/७ | ०-३२-० |

| अ.क्र. (१) | स. नं. हि. नं. (२) | क्षेत्र (हे.आर) (३) |
|---|---|---|
| ३२९ | २७४/८ | ०-१८-० |
| ३३० | २७४/९ | ०-२४-० |
| ३३१ | २७४/११ | ०-६५-० |
| ३३२ | २७९/१० | ०-२१-८ |
| ३३३ | २८५/१ब | ०-०१-० |
| ३३४ | २८५/५अ | ०-०४-२ |
| ३३५ | २८६/१ | ०-०३-० |
| ३३६ | २८६/२ | ०-११-० |
| ३३७ | २८३/३ | ०-०९-० |
| ३३८ | २९४/१० | ०-०९-७ |
| ३३९ | ३००/१ | ०-३२-२ |
| ३४० | ३०४/१ | ०-१७-० |
| ३४१ | ३१०/६ | ०-१२-४ |
| ३४२ | ३१२/६ | ०-०८-४ |
| ३४३ | ३१३/७ | ०-४०-५ |
| ३४४ | ३१८/२+३+४अ | ०-१६-३ |
| ३४५ | ३४७/११ | १-२९-० |
| ३४६ | ३४७/१२ | ०-९३-० |
| ३४७ | ३४८/३ | ०-१३-४ |
| ३४८ | ३४८/४ | ०-०३-८ |
| ३४९ | ३५३/० | ०-११-१ |
| ३५० | ३५६/१ | ०-२४-० |
| ३५१ | ३५६/५ | ०-००-९ |
| ३५२ | ३५६/७अ | १-०७-५ |
| ३५३ | ३५६/८ | ०-४७-० |
| ३५४ | ३५६/९ | ०-६५-० |
| ३५५ | ३५६/११ | ०-५०-० |
| ३५६ | ३५९/१०अ | ०-२८-५ |
| ३५७ | ३६०/१क | ०-१४-० |
| ३५८ | ४०४/० | ०-६८-५ |
| | एकूण | ७८-१४-८ |

**अनुसूची दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

| | |
|---|---|
| अधिसूचना प्रकल्पाचे नाव | नवी मुंबई प्रकल्प व तद्रुषंगिक कामे |
| निर्माण प्रकल्प कार्याचे वर्णन | नवी मुंबई प्रकल्पाला अनुसरुन नेरुळ बेलापूर सीवूड उरण रेल्वे कॉरीडोर प्रकल्पास गती देण्यासाठी व नवी मुंबई प्रकल्पासाठी विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेली जमीन संपादन करणे. |
| करण्यापूर्वी समाजाला मिळणारे लाभ | नवी मुंबई विकासाच्या दृष्टीने नियोजित नागरी सुविधांचा लाभ समाजातील सर्वच लोकांना होईल. |

**अनुसूची तीन**

| | |
|---|---|
| बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कामे | निरंक |

**अनुसूची चार**

**सामाजिक निर्धारण सारांश**

मौजे-गव्हाण येथील ७८-१४-८ हे.आर.ही जमीन नवी मुंबई प्रकल्पाला अनुसरुन नेरुळ बेलापूर सीवूड उरण रेल्वे कॉरीडोर प्रकल्पास गती देण्यासाठी व नवी मुंबई प्रकल्पासाठी विकासाच्या दृष्टीने आवश्यक असल्याने सदर जमिनीचे भूसंपादन प्रस्तावित आहे. सदर भूसंपादन शहर व औद्योगिक विकास महामंडळ अर्थात सिडको करिता नवीन भूसंपादन कायद्यान्वये संपादित करून त्याबदल्यात २२.५% विकसित भूखंडाचा मोबदला देऊन संपादन करण्यात येत आहे. नवी मुंबई हे शहर मुंबईची गर्दी कमी करण्याचे साधन राहिले नसून एक आकर्षक केंद्र बनले आहे. नवी मुंबईचा आंतर भाग आता स्मार्ट सिटीच्या यादीमध्ये झाला आहे. यामुळे नवीन प्रकल्पाचा विस्तार नवीन टप्प्यांवर पोहचला आहे. खऱ्या अर्थाने मुंबईला पर्याय म्हणून हे शहर विकसित झाले आहे. त्यामुळे परिसरात लागणाऱ्या सोयीसुविधा गव्हाण गावातील जमीन भूसंपादनाकरिता प्रस्तावित आहे. नागरी सुविधांकरिता नितांत आवश्यकता आहे. सदर जागेचा वापर विविध नागरी सुविधांकरिता होणार असल्याने अंतिमतः याचा लाभ समाजाला होणार आहे.

**अनुसूची पाच**

| | |
|---|---|
| नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील | प्रशासकाची नेमणूक करण्यात आलेली नाही. |

पनवेल,
दिनांक २ डिसेंबर २०२१.

**दत्तात्रय नवले,**
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
मेट्रो सेंटर क्र. १, उरण.

**क्र. जिमाका/राअ/जाहि./१७७/२०२१-२२**

# पुण्याला दुहेरी मुकुट

## राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा





**सोलापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व सोलापूर अमॅचूर खो-खो असोसिएशन यांच्या मान्यतेने ५७ वी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा वेळापूर (ता. माळशिरस, जि. सोलापूर) येथे झाली. या स्पर्धेत पुण्याने दुहेरी मुकुट मिळवला. यापूर्वी १९९५-९६ साली कुळगाव (ठाणे) येथे झालेल्या ३४ व्या पुरुष- महिला राज्य अजिंक्यपद निवड चाचणी खो-खो स्पर्धेत पुण्याने दुहेरी मुकुट मिळवला होता.

या स्पर्धेतील सर्वोत्कष्ट अष्टपैलू खेळाडूसाठी असलेली राणी अहिल्या पुरस्काराची मानकरी प्रियांका इंगळे ठरली, तर पुरुष गटातील राजे संभाजी पुरस्काराचा मान प्रतीक वाईकर याने मिळविला. स्पर्धेतील तृतीय स्थान महिला गटात उस्मानाबाद आणि पुरुष गटात सांगलीने संपादन केले.

महिलांच्या अंतिम सामन्यात गतविजेत्या पुण्याने ठाण्यावर १३-१२ असा ३.४० मिनिटे राखून विजय मिळविताना विशेष प्रयास करावे लागले नाहीत. प्रियांका इंगळे, दीपाली राठोड व श्वेता वाघ यांच्या शानदार खेळीमुळे पुण्याने मध्यंतरास ९-५ अशी आघाडी घेतली होती. ठाण्याच्या रेश्मा राठोड, मृणाल कांबळे व कविता घाणेकर यांची खेळी अपुरी पडली.

पुरुषांच्या अंतिम सामन्यात पुण्याने गतविजेत्या मुंबई उपनगरला १७-१६ असे एका गुणाने नमविले. या सामान्यतील चुरस इतकी टोकाची होती की शेवटच्या क्षणापर्यंत खेळाडूंनी केलेल्या खेळींनी प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. मध्यंतरापर्यंत ८-८ अशी बरोबरी झाल्यानंतर निर्णायक आक्रमणात मुंबई उपनगरचा गुण मिळविण्याचा, तर पुणे संरक्षणात बचाव करण्याचा प्रयत्न करीत होता. अखेर शेवटच्या मिनिटात पुण्याने बचाव करीत बाजी मारली. पुण्याच्या मिलिंद करपे, प्रतीक वाईकर व सागर लेंग्रे यांची अष्टपैलू खेळी संघाच्या विजयात महत्त्वपूर्ण ठरली. मुंबई उपनगरच्या अक्षय भोंगरे, अनिकेत पोरे, ऋषिकेश मुरचावडे याची लढत अपुरी पडली.

तृतीय स्थानासाठी झालेल्या सामन्यात लघुत्तम आक्रमणाच्या डावात महिला गटात उस्मानाबादने रत्नागिरीवर २३ सेकंदाने, तर पुरुष गटात सांगलीने ठाणेवर ११ सेकंदाने मात केली.

# एनबीपीएलचा 'नेरळ इंडियन' विजेता

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुका बॉक्स केईकेत असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित नेरळ बॉक्स क्रिकेट प्रीमियर लीगचे विजेतेपद नेरळ इंडियन्स संघाने पटकाविले.

३२ व्यावसायिक संघाचा समावेश असलेल्या या स्पर्धेचे परदेशी मैदानावर आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे यंदाचे सलग तिसरे वर्ष होते. स्पर्धा लीग पद्धतीने खेळविली गेली. अंतिम सामन्यात तन्वीर शेख-मुस्तफा तांबोळी यांच्या नेरळ इंडियन्स संघाने दर्शन मोडक यांच्या दर्शू इलेव्हन संघावर बाजी मारत विजेतेपद पटकाविले. तिसरा क्रमांक डीए कॅपिटल या दिनेश आढाव यांच्या संघाने, तर विशाल आव्हाड यांच्या नेरळ चॅलेंजर संघाने चौथा क्रमाक मिळविला. स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज म्हणून भूषण गवळे, उत्कृष्ट गोलंदाज अबरार शेख, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक अभिषेक जाधव आणि उत्कृष्ट यष्टीरक्षक कौस्तुभ टिल्लू यांची निवड करण्यात आली. विजेते संघ आणि उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.



# खेलो इंडिया स्पर्धेंतर्गत 'सीकेटी'त कुस्तीचे सामने





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात जिमखाना समितीच्या वतीने मंगळवारी (दि. १४) खेलो इंडिया आंतर-विद्यापीठीय कुस्तीचे निवड सामने आयोजित करण्यात आले होते. त्यास प्रतिसाद लाभला.

या सामन्यांसाठी मुंबई विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मोहन अमृले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तसेच शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त आंतरराष्ट्रीय मल्ल नामदेव बडरे, प्रकाश जाधव, आंतरराष्ट्रीय मल्ल रंगराव हरणे, आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षक व क्रीडा अधिकारी संदीप वांजळे उपस्थित होते.

या वेळी डॉ. मोहन अमृले, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. के. पाटील आणि क्रीडा समन्वयक डॉ. व्ही. बी. नाईक यांनी कुस्तीदेवता हनुमान प्रतिमेचे पूजन करून क्रीडाज्योत प्रज्वलित केली व डॉ. अमृले यांनी उपस्थितांना संबोधित केले. प्रभारी प्राचार्य डॉ. पाटील यांनी अध्यक्षीय भाषण केले. प्रा. अनिल नत्ती व खेळाडूंनी शपथ घेतली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे आयक्यूएससी समन्वयक डॉ. बी. डी. आघव, रूसा समन्वयक डॉ. शैलेश वाजेकर यांनी मार्गदर्शन आणि शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जी. एस. तन्वर, डॉ. आर. व्ही. येवले, रूपेश पावशे आणि जिमखाना समितीच्या सदस्यांनी केले, तर आभार प्रा. अजिंक्य भगत यांनी मानले.

उपक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर आणि सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# पालीतील अनुज सरनाईकला सुवर्णपदक

### राज्यस्तरीय पिंच्याक सिल्याट स्पर्धेत चमकदार कामगिरी

**पाली : प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वर येथे झालेल्या अकराव्या राज्यस्तरीय पिंच्याक सिल्याट स्पर्धेत पालीतील अनुज सरनाईकने वरिष्ठ पुरुष ७५ ते ८० वजनी गटात सुवर्णपदक पटकाविले आहे.

या स्पर्धेत ३४ जिल्हे आणि १४ क्लबमधील ७०० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचा बक्षीस समारंभ पिंच्याक सिल्याट फेडरेशनचे अध्यक्ष किशोर येवले, महाराष्ट्र असोसिएशनचे अध्यक्ष सुरेंद्र प्रताप सिंग, खजिनदार मुकेश सोनवाणे यांच्या हस्ते झाला.





# जडेजा होणार कसोटीतून निवृत्त?

**नवी दिल्ली :** टीम इंडियाचा स्टार अष्टपैलू क्रिकेटपटू रवींद्र जडेजा दुखापतीमुळे दक्षिण आफ्रिका दौऱ्यातून बाहेर पडला आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या कानपूर कसोटीदरम्यान जडेजाला दुखापत झाली होती. याच कारणामुळे तो मुंबई कसोटी सामन्यातून बाहेर पडला होता. आता त्याच्या दुखापतीदरम्यान मोठी बातमी समोर आली आहे. रवींद्र जडेजा क्रिकेटच्या या फॉरमॅटमधून निवृत्ती घेणार, अशी बातमी समोर आली आहे.







भाजपा भटके विमुक्त आघाडीचे रायगड जिल्हा अध्यक्ष
बबन बारगजे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
भाजपा
सौजन्य : महेश बारगजे

वर्ष ३८ वे ॥ श्री बाळकृष्णाय नम: ॥ स्थापना १९८३
मार्गशिर्ष शुध्द (त्रयोदशी) ते दत्तजयंती मार्गशिर्ष शुध्दपोर्णिमा अखंड हरिनाम सप्ताह
श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ भाऊसाहेब महाराज की जय ॥
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ मिरीमल्लेश्वर महाराज की जय ॥
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ बाळकृष्ण महाराज की जय ॥
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ दादा महाराज की जय ॥
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज की जय ॥
श्री स. स. प्रमिचैतन्य महाराज की जय ॥
गुरु चरणी ठेवीता भाव । आपोआप भेटे देव ॥



श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर) | श्री समर्थ सद्गुरु दादामहाराज (मुंबई) | श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर) | स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर) पिताजी | स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर) माताजी

अनंत कोटी ब्रह्मांडनायक श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज यांच्या आशिर्वादाने पूनीत शिवाजीनगर माऊली मंदीरामध्ये श्री. स. स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर, यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरू चरित्रामृत ग्रंथाचे श्री दासबोध एकनाथ भागवत पारायण पर्वणी प्रारंभ मार्गशीर्ष शुध्द ॥१३॥, शके १९४३, गुरूवार दि. १६/१२/२०२१ रोजी सकाळी १०.०० वा. प्रारंभ ते मार्गशीर्ष शुध्द ॥१५॥ पोर्णीमा शके १९४३, दत्तजयंती शनिवार दि. १८/१२/२०२१ रोजी दुपारी १२.०० वा. माऊलीवर पुष्पवृष्टी होणार आहे. सर्व भागातील गुरूबंधू, भाविक भक्तांनी उपस्थित राहून आपला देह सार्थकी लावावा. तसेच भजन, प्रवचन कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

नित्याचे कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ५.०० ते ६.०० | काकड आरती |
| सकाळी | ६.०० ते ७.०० | श्री ची नित्यपुजा |
| सकाळी | ७.०० ते ९.०० | ग्रंथवाचन व ध्यान |
| सकाळी | ९.०० ते १०.०० | भजन |
| सकाळी | १०.०० ते १२.०० | प्रवचन |
| दुपारी | १२.०० ते १.०० | दुपारची आरती |
| संध्याकाळी | ५.०० ते ६.०० | ग्रंथ वाचन व ध्यान |
| संध्याकाळी | ६.०० ते ७.०० | संध्याकाळची आरती |
| रात्री | ७.०० ते ८.०० | ग्रंथ वाचन व ध्यान |
| रात्री | ९.०० ते ११.०० | भजन व किर्तन |

दैनंदिन कार्यक्रम

गुरूवार दिनांक १६/१२/२०२१

| | |
|---|---|
| सकाळी ८ ते १० भजन | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा)<br>बुवा : गणपत ठाकूर, निनित ठाकूर<br>पखवाज : आत्माराम मोकल |
| सकाळी १० ते १२ प्रवचन | श्री. स.स.बाळासाहेब महाराज, नंदेश्वर<br>श्री. भागवत साहेब, पुणे,<br>ह.भ.प. आप्पा पांचाळ, चिपळूण<br>श्री. रमण ठाकूर, न्हावाखाडी |
| दुपारी २ ते ४ भजन | भावभक्ती महिला भजन मंडळ, गव्हाण-खारकोपर<br>गायीका : सौ. रत्नप्रभा घरत, श्रीमती. हिरुबाई घरत, सौ. चंद्रप्रभा घरत, सौ. आनंदी घरत<br>श्री. गुरूकृपा प्रासदिक भजन मंडळ, खारकोपर<br>गायीका : सुप्रिया घरत<br>पखवाज : तुषार घरत (चिर्ले उरण) |
| दुपारी ४ ते ६ भजन | श्री. विश्वंभर भजन मंडळ. गव्हाण<br>गायक : हेमंत कोळी, रविराज कोळी आणि मंडळी |
| सायं ८ ते ९ भजन | दत्त प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर<br>बुवा : वसंतशेठ पाटील (खारकोपर), देवानंद कोळी (गव्हाण)<br>पखवाज : बि. टी. कांबळे (गुरूजी) खारकोपर, गौरव म्हात्रे (गव्हाण) |
| रात्री ९ ते ११ किर्तन | श्री. ह.भ.प. एकनाथ महाराज पाटील (वाशी, नवी मुंबई) C.A. |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, जागर भजन |

✽ व्यवस्थापक ✽
देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय),
शिवाजीनगर-गव्हाण- खारकोपर
न्हावे - न्हावेखाडी (संचलित)

✽ संयोजक ✽
श्री. रामशेठ ठाकूर (मा. खासदार, रायगड)
ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर

✽ कार्यक्रमाचे स्थळ ✽
श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर
मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड.
फोन नं. ९१६७९९१०४५

(प्रसंगानुसार कार्यक्रमात फेरबदल करण्यात येईल, कार्यक्रमाच्या वेळेला महत्त्व दिले जाईल.)

पुण्यतिथी सोहळा



वर्ष २८ वे
कै.ह.भ.प.हरिश्चंद्र लक्ष्मण पाटील
(माजी सरपंच)




(१४ वा पुण्यस्मरण)
कै.ह.भ.प. अनुसया हरिश्चंद्र पाटील

कै. ह.भ.प. हरिश्चंद्र लक्ष्मण पाटील
कै. अनुसया हरिश्चंद्र पाटील
बुधवार दि. १५-१२-२०२१ रोजी

कार्यक्रम
प्रतिमेचे पूजन
हरिपाठ
अभंगवाणी

वारकरी जोड भजन
रात्रौ ९.३० ते १०.३० वा.
जय गावदेवी प्रासादिक भजन मंडळ कांढरोली (वनखळ), आसरेवाडी व खालापूर
**गुरुवर्य** – ह.भ.प. रमेश महाराज महाडीक, ह.भ.प. वसंत मोरे, वै.ह.भ.प. शांताराम ग. गायकवाड.
**गायक :** सर्वश्री महेशबुवा महाडीक, रघुनाथबुवा पाटील, निवासबुवा शिंदे, संदीप महाराज यादव, अरविंद दळवी, सतिशबुवा गायकवाड, केतनबुवा पवार, सूर्यकांतबुवा दळवी, ह.भ.प. संजय बारस्कर.
**मृदंगमणी :** सर्वश्री निवासबुवा शिंदे, संदेशबुवा मालकर, सुरजबुवा पाटील, दामोदर पालांडे, अशोकबुवा मोरे, गणेशबुवा पाटील. **साथकरी :** ग्रामस्थ मंडळ कांढरोली (वनखळ), आसरेवाडी, सदाशिव ठोंबरे, कमळाकर काईनकर, अशोक काईनकर, दिगंबर येरुणकर, पांडुरंग काठावले, ह.भ.प. गोविंद निकम, ज्ञानेश्वर दळवी, भगवान भोईर, समीर पवार.
**सल्लागार :** मोहन दळवी, शरद शिंदे, सुनील गायकवाड, दशरथ कडव, राजेंद्र दळवी, संतोष कडव, समीर दळवी, रुपेश पवार, किसन पवार, मंगेश गायकवाड, शेखर शिंदे, राजेंद्र रा. दळवी, संदीप पवार, राजेश पालांडे, रुपेश महाडिक, रोशन महाडिक, ललीत कडव, सोमनाथ दळवी, अमोल मोरे, उमेश पवार, नंदकुमार गायकवाड, नामदेव दळवी, चंद्रकांत दळवी, प्रशांत बिरवाडकर.

रात्रौ १०.४५ ते १२.१५ वा.
श्री. डांगर्णेश्वर सांप्रदायिक वारकरी भजन मंडळ, मोरबे
**गुरुवर्य** – वै. ह.भ.प. रामदास महाराज दहिफळे (देवाची आळंदी)
गायक : महेश पाटील, चंद्रकांत पाटील, ह.भ.प. सुरेशबुवा उलवेकर, रमेश नावडेकर, अमोल उलवेकर, प्रतीक शेळके, शेखर खोपकर, तुकाराम गायकर, रामदास म्हात्रे, वासुदेव नावडेकर.
**पखवाज :** ॲड. सुरज गोंधळी, उत्तम उलवेकर, जितेश नावडेकर, मोहन शेळके.
**विणेकर :** ह.भ.प. प्रभाकर महाराज.
**चालक :** आई गावदेवी व डांगर्णेश्वर ब्रास बॅण्ड मोरबे, समस्त ग्रामस्थ मंडळ, मोरबे.



आपले नम्र
**श्री. प्रकाश हरिश्चंद्र पाटील** **श्री. बाबुराव लक्ष्मण पाटील** (मा. सरपंच)
**श्री. राजेंद्र हरिश्चंद्र पाटील** (मा. सदस्य-रायगड जिल्हा परिषद, अध्यक्ष-जनता माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, आजिवली)
व्यवस्थापक : ग्रामस्थ मंडळ, कोळखे, पनवेल-रायगड
पत्ता : ''आई बंगलो'', मु. कोळखे गाव, ता. पनवेल. जि. रायगड.


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com